म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# चित्र.

व

# परमार्थाचें पद्यरूप दिग्दर्शन.



REFBK-0001831

हें पुस्तक सर्व आर्यभगिनींस प्रेमपूर्वक अर्पण केलें असे

पुस्तककर्ता.

वा० क्र० १८३१

क्र. १८३१

REFBK-0001831

REFBK-0001831

श्रीगजानन प्रसन्न.

---

# संसार चित्र.

व

## परमार्थाचें पद्यरूप दिग्दर्शन

---

हें पुस्तक

**राधाबाई कृष्णाजी दांडेकर**

हिनें तयार करून

अलीबाग ' **सत्यसदन** ' छापखान्यांत छापिलें

---

कार्तीक शुद्ध १ शके १८४२

**किंमत** ०।० **आणे**

---

**श्लोक**

वंदूनि तात जननी गुरु ईश्वराशीं ।
ज्यांचे कृपें हृदयिं ज्ञान मति प्रकाशी ॥
श्री रामचंद्र स्मरुनी करिं लेखनाला ।
सन्मार्गदर्शक अशा प्रमदा जनाला ॥ १ ॥

---

( १८६७ च्या २५ आक्टाप्रमाणें हक्क नोंदले आहेत )

## श्रीराम.

## प्रस्तावनारूप चार शब्द.

### दिंडी

कमलशयना कमलाक्ष कमलनाभा ।
कमल हस्तीं पदकमलिं पूर्ण शोभा ॥
कांत कमलेचा कमलवदन देवा ।
नमित प्रेमें मज नाहीं दुजा हेवा ॥ १ ॥

वाचकवर्गीय स्त्री जातीलाच अनुसरून जें बोलेन तें खरोखरच त्यांना हितावह आहे. तरी गाण्यांपेक्षांही प्रस्तावनेकडे त्यांचें जास्त लक्ष असावें. असो, कोणतेंही कृत्य करणें तें देश, काल व स्थीति याला धरून असलेलेंच इष्ट होय. त्यामुळेंच कांहीं फायदा झाला तर होईल. फायदा ह्मणजे मला कांहीं कोणी पुस्तक केल्याबद्दल शाबासकी देण्यास नको, किंवा तें चरितार्थालाही कारणीभूत ह्मणून मुळींच केलेलें नाहीं. कारण पुस्तक केल्याचें नवल अगर धन्यता व किर्ती हें सांप्रतकाळीं वाटणें नको आहे. अहो, हल्लीं या

जगांत गद्यपद्यरूप विषय इतका कांहीं फैलावला आहे कीं, कितीकांनीं तरी नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी, गाणीं, गीतार्थ वगैरे शद्बब्रह्म अगणीत पसरून ठेविलें आहे. खरोखरच तें जर प्रमाणांत असतें तर कधींच खपून गेलें असतें. पण ईश्वराला योजनाच तशी करावी लागली. असो, एवंच काय तर पुढील विषयक जें संसारचीत्र व पद्यात्मक परमार्थाचें दिग्दर्शन नांवाचें पुस्तक तुह्मांस देत आहें तें माझें कर्तृत्व या नात्यांनीं न देतां माझें सांगणें या नात्यांनीच दर्शवीत आहे. तरी त्याचा नीट विचार कराल काय? स्त्रीयाहो, देश काल स्थिति याला धरून ह्मणजे काय, तर आपण हल्लीं कोणत्या देशांत असून कोणती नड ईश्वर स्मरणास अगर देशसुधारणेस आड येत आहे! तसेंच हा काल कोणता ह्मणजे जन्म कोणता व तो किती अवधीपर्यंत टिकेल हा विचार मनांत घेणें. तसेंच आपली स्थिति कशी व किती परावलंबी असून सर्वतोपरी पंगू होऊन शाश्वत सौख्याची वाण पडणार आहे. याचा अंदाज तुह्मांला काढतांच न यावा. दुर्भाग्य? अशी स्थिती या तिन्हीं गोष्टींना एक हा— तन मन धन

अर्पण केलेला अंतःकरणांतील दुष्ट अशा कल्पनांचा समुदाय जो तो—संसारच कारणिभूत होय! व ह्मणूनच त्याजविषयींचें अंशतः तरी वैराग्य उत्पन्न होऊन मग सद्विचार करण्याला हृत्पटांत जागा मिळेल. अशा तऱ्हेचा त्याचा रुपांत सावयव फोटो या पुस्तकांत पहिल्यानींच तुमच्यापुढें उभा केला आहे. कदाचित् हें वेडगळपणाचें गाणें ऐकून कोणी असेंही ह्मणेल कीं, जो डोळ्यांनीं पहातों, कानांनीं ऐकतों, व मनानें चिंतन करून कर्मेंद्रियांनीं ज्याच्याच बद्दलचीं कर्में करतो, असा जो प्रत्यक्षतर संसार, तो गाणें या रूपानें विस्ताररूप दर्शीत करण्यांत मोठसें काय महत्व वाटलें!! होय, आक्षेप खरा आहे. मीही कबूल करतें. पण याला पहिला आधार ह्मणजे आपण मनुष्य खरोखरच अशींच अज्ञ आहों व ह्मणूनच आवीं फोटो दाखविण्याचें कारण पडलें. पहा, ज्या परमात्म शक्तीमुळें पंचभौतिक देह चलन वलन पावतो, व जें आत्मतत्व सर्वेंद्रियांना चलन देतें अशी प्रकाशीत वस्तु असूनही ती अज्ञानी जनास कळते काय? (नाहीं) तर देहापासूनचा परकीय पदार्थ जो फक्त आचरणांत

आलेला पण जड! तो मानवांना त्यांतही प्रपंचीक अबला स्त्री वर्गाला कळायला हा संसार कसा बरें पात्र होईल! याला दृष्टांत असा कीं, एखादा राक्षस जरी महाभयंकर असला, तथापी त्याचा एकदां हात, एकदां पाय, एकदां भयंकर मूख व दांत वगैरे पृथक् रूपानें एकेक अवयव पाहिले तर तो तेवढा भयंकर वाटणार नाहीं. पण तोच सावयव राक्षस जर एकदम नजरेस पडला तर खरोखरच भीती पावेल कीं नाहीं? त्याचप्रमाणें आह्मीं जरी संसार करीत आहों, तथापी त्यांतील कामें एक दिवशीं एक तर दुसऱ्या दिवशीं दुसरें असें करीत असल्यामुळें सबंध काल व्यय होतच आहे. तथापि तो तितका भयंकर वाटत नाहीं. करितां या अंतरबाह्य व्यापक असलेल्या सप्रेमजन्य संसाररूप राक्षसाला आपलें सर्व आयुष्य खावयास न देतां स्वजातीय वर्ग ह्मणजे स्त्रीजात—आपला धर्म व आपला देश किंवा मनुष्यजन्माचें ध्येय जो परमेश्वर या तीन गोष्टींना अर्पण करण्यास जर पात्र होईल तर केवढें हीत होणार आहे. अहो, देशाकरतां, स्वराज्याकरतां, स्वसुखाकरतां फक्त एक स्वधर्म व त्या धर्माचा जो

फलदाता ईश्वर हीं दोन पाहिलीं ह्मणजे सर्व कार्य होतें. वृक्षाचीं पानें, फांद्या व कोणताही वरील विस्तार यास पाणी घालून फळ येतें काय? व तो वृक्ष चिरकाल टिकेल काय? हें लक्षांत ठेवा. त्याचप्रमाणें नुसती देशोन्नतीची ओरड करून धर्म, ज्ञान, भक्ती, हें मूळ शिंपल्याशिवाय जय कसला? जालंधराच्या अप जया कारितां विष्णूने वृंदेच्या पातिव्रत्याचा भंग केला तेव्हां तो अपजय झाला. मग पुरुषांपेक्षां स्त्रीसमाज जास्त धार्मीक व विचारशील पाहिजे कीं नको? आतां हा दृष्टांत एकदेशी खरा, पण तो धर्म या मथळ्या खालीं सर्व बाजूंचा धरावा. हल्लीं स्वधर्म, स्वकर्म, लौकिक, लज्जा, लीनपणा, सत्य, स्वानुभवाचा अभ्यास, वगैरे पौराणीक विषय व देहदंड कर्मे फक्त गतकांत अबलांचींच ठरून गेलीं आहेत. जणूं काय तें त्यांचेंच कर्तव्य असून इतर स्त्रियांस मनाप्रमाणें वागण्याचें शास्त्र नवीन कोणी काढलें आहे असा भास होतो. असो, कोणी कांहीं ह्मणो, कोणाची समजूत कशी असो, मला एक समजतें. द्रौपदी काय वेडी होती ह्मणून ५पती असतांनासुद्धां कृष्णपरमात्म्याशिवाय इतर कोठेंही

मन नव्हतें! पण पहा, वस्त्रहरणाच्या वेळेस ५ पतींकडून लज्या राखिली गेली नाहीं. तशीच पार्वती शंकरापासून सर्व पुराण शास्त्रें ऐकत नसे का! मग तुह्मीच कां मनोरंजन वाचावें! आपणांस त्याची कां नड असावी! व संसाराशिवाय कांहीएक न दिसून देहालाच नटवीत बसावें? स्त्रीया हो संसार कसा आहे याला दुसरा दृष्टांत पहा. एखादा लफंग्या मनुष्य आपणांस नाना तऱ्हेच्या थापा देऊन व मोहक अशी वस्तू दाखऊन पैसे वगैरे लक्षुमी काढून घेऊन पसार होतो. त्या प्रमाणें हा संसार आहे. पहिल्यानी फार बरा वाटतो. पण आयुष्य पैसा हिराऊन ह्मातार पण आलें कीं, **इदं नास्ति परं न लभ्यते**, असें होतें. ह्मणून ह्या ५२पानांच्या पुस्तकरूपानें हल्लींच्या स्वदेशाच्या सुधारणें प्रमाणेंच स्वज़ातीला सुधारण्याचा संसार फोटो काढून पुढें ठेवीत आहें, व त्यांतच पुढें ४२ पाने परमार्थाचें पद्यरूप दिग्दर्शन देऊन पुस्तक समाप्त करीत आहें. आमच्या वायकी बोलण्यांत एक ओरड असते कीं, सत्कार्याला व कोणत्याही तऱ्हेनें संसार दूर करण्याला वेळ कोठें आहे! वाहवा? तक्रार खरीच. पण

ईश्वरानेंच ४ प्रहराचे ३ प्रहर ठेविले असते तर तुमच्या हातांत तें प्रमाण जास्त करण्याचें नव्हतें ना? तसेंच समजा कीं, चार प्रहरांतून वेळ असेल त्यांतच पाव हिस्सा तरी सत्कार्यीं व्यय झालाच पाहिजे. पुस्तककर्ती संसारिक असून उगीच बोध करीत बसली आहे, असें ह्मणाल तर, ऐका:—

**ओवी**

जो शिकलेला पोव्हाणी ।
तो काय भितो पाहून पाणी ।
तैसा संसार जाणूनी निस्पृहपणानीं ।
नव्हे बाधा ॥ १ ॥

**अभंग**

करूनियां कर्म अकर्तेपणाचा ।
अनुभव त्याचा त्याशीं कळे ॥ १ ॥
संसारीं उदास सुख दुःख यास ।
स्पर्शूं न दे खास मनामाजी ॥ २ ॥
बाह्य दृष्टीनें जे बोलती त्यां कैसें ।
वर्म कळे ऐसें अंतरींचें ॥ ३ ॥
कृष्ण योषितेस ह्मणो कोणी कैसें ।
मानापमानाचें कोण पाहे ॥ ४ ॥

असो, खरा संसार ह्मणजे अंतरांतच भावनाजन्य आहे. वस्तुरूप संसार मुळींच त्याज्य नको. प्रस्तावना हें पुस्तकच होऊं पाहात आहे. पण ती आतां येथेंच पुरी करितें.

या पुस्तकांत विषयांचीं एकंदर पानें ९२ पैकीं ५२ पानें संसारचित्राचीं असून ४० पानांत ५ पदें, १ संवाद (आई मुलीचा), १३ गाणीं, १ आरती (मंगळागौरीची) व समासदर्शक १ दिंडी व १ अभंग असा विषयानुक्रम आहे.

पदें व गाणीं एकाच मासल्याचीं आहेत. कांहीं कारणानें नांवें भिन्न दिलीं इतकाच फरक होय.

यांतील कवितांच्या प्रासांत किंवा ऱ्हस्वदीर्घांत जे कांहीं दोष राहिले आहेत त्यांचें शेवटीं शुद्धिपत्र देऊन पुढील आवृत्तींत ते सुधारले जातील.

पदांच्या व गाण्यांच्या साधारण प्रचारांतल्या चाली दिल्या आहेत. तथापि त्या चालीला जुळतील असेंच वाचावें लागतें.

मु० अष्टमी तालुका रोहें
हल्लीं वस्ती थळ तालुका अलिबाग.
राधाबाई कृष्ण दांडेकर

## मुद्रकाचे चार शद्ब.

स्त्रियांच्या हृत्पटलावर संसार चित्र हें विधिनिर्मीतच आहे. तेव्हां त्या चित्राचें प्रतिबिंब श्रीमति राधाबाईंनीं अगदीं सोप्या गाण्यानें आपल्या भगिनी वर्गाच्या मनास पटेल असें उठवण्याचा केलेला प्रयत्न चांगला साधला आहे.

प्रत्येक कडव्याच्या खालीं अर्थ दिलेला पाहिला, ह्मणजे इतक्या सोप्या भाषेच्या गाण्याला अर्थ कशाला पाहिजे? असें वाटतें. आह्मीं या संबंधानें राधाबाईंकडून खुलासा मागविला त्यांत त्या ह्मणतात. ज्यांचा आवाज कोमल नसून ज्यांना गाण्याची अभिरुची कमी असेल त्यांणीं गाणें सोडून नुसता अर्थच वाचिला तरी त्यांस तो सुसंगत वाटावा ह्मणून त्या गद्यरूप वर्णनास अर्थ अशी संज्ञा देऊन तो प्रत्येक कडव्याखालीं दिला आहे.

अर्थ वाचतांना एक गोष्ट सहज लक्षांत येते, ती ही कीं, प्रापंचीक कामांचें वर्णन करीत असतांना मधून मधून राधाबाईंनीं आपल्या भगिनी वर्गाला भगवद्भक्तीचा उपदेश करून कालाचा सद्व्यय कशा रीतीनें करावा हें दाखविलें आहे.

हें संसारचित्राचें गाणे छापीत असतांना " बायकांच्या गाण्यांत बायकी विषयांपेक्षां आणखी तें काय असणार!! किंवा भक्तीचें वर्णन असलेंच तरी तें " **तुळसीखालीं राम, पोथी वाची** " याच्यापेक्षां अधीक तें काय असणार!! असें आह्मांस सहजच वाटलें. परंतु त्यांहीं केलेलीं कांहीं पदें व गाणीं या पुस्तकांत दिलीं आहेत. तीं वाचिल्यानंतर ईश्वराविषयीं त्यांची सात्विक भावना व निर्मळ भक्ति असल्याचें दिसून येतें व कवित्वगुणही त्यांच्या ठिकाणीं नैसर्गिक असल्याचें दिसतें. त्यांची कविता प्राचीन पद्धतीची, सरळ व भाषा सुबोध असून त्यांत भक्तिरसाला पोषक असा प्रेमळपणा फार आहे. राधाबाईनीं आपला लेखनक्रम असाच चालू ठेविल्यास त्या भक्तिमार्गांतील कविमाळेंत गणण्यास पात्र होतील असें आह्मांस वाटतें.

**रावजी हरि आठवले.**

||श्री राम||

श्रीगणेशायनमः

# संसारचित्र

उर्फ

## संसाराचा वाङ्मय फोटो.

---

### कडवें पहिलें

उत्तम ही नरतनू येऊनी जाई पहा फुकट ।
गुंततसे दिन रात्र चिंच मिठ कुटावया तिखट ॥
हळद फेडिली उद्यां दळिन आज शिंगाडे कुटिन ।
लावी द्रोण पत्रावळी चोया करीतसे झटून ॥
वाती दिव्याच्या सरल्या ह्मणुनी कापुस विंचरला ।
तों सासु ह्मणे काफी कुटगे डबा असे सरला ॥

चाल बदलून-- हें झालें अधीक परीतें ।
रोजचें काम न पुरतें ।
होई तें झरझर करीते ॥

चा० प०– उटुनि सकाळीं मुख प्रक्षाळी देवाला वंदी ।
तोंच मुलांनीं त्वरित पाहिली रडण्याला संधी ॥
करा स्त्रियांनो हा सुविचार मी तरेन कशी जलधी ।
खरोखरी या संसारामधें वेळ नसेच कधीं ॥ ध्रु० ॥

अर्थ– स्त्रियांनो, आपणास हा उत्तम ह्मणजे लक्ष चौऱ्यायशी योनीमध्यें ज्याला श्रेष्ठ ह्मणतात व दिसतोही, तो असा नरजन्म मिळाला असून त्याची महत्वी न वाटतां किंमतही कळत नाहीं, व ह्मणूनच त्याला सारखा कावाड कष्ट ह्मणजे व्यवहारीक शरीराचे व मनाचे कष्ट देत आहों!! ते कोणते तर, दिवसरात्र मिळून आठ प्रहर आहेत, त्यांत झोंपेपुरता वेळ शिल्लक ठेऊन पुढें लिहिल्याप्रमाणें कामें करून घेत आहों. तीं हीं– कधीं चिंच काटळणें तर कधीं मीठच दळणें, लगेच तिखट कुटण्याची तयारीच. हळद फोडतांच शिंगाडे उपासाला हवे ह्मणून पीठ तयार केलेंच पाहीजे. द्रोण पत्रावळी तर झटूनच कराव्या लागतात. कारण त्यांची विकत घेण्याची पाळी न यावी ह्मणून. इतकें करतोंच, पण त्यांतल्यात्यांत दिव्याच्या वातींना कापूस विंचरणेस घेतला. इतक्या अवधींत सासुबाईची वर्दी

आलीच, कायग आज चार दिवस काफी संपल्याला झाले, तुला वेळ नाहींका मिळत? नसेल मिळत तर मला सांग. असें बोलतांच तें ही काम केलें. पण भगिनीनों समजलें का, हें दर्शीत केलेलें काम नवें अधिकांतलें आहे. पण नित्याचेंच काम कोठें आटपत आहे? कसें तें पहा. सकाळीं लवकर उठतें, हस्तपाद प्रक्षालन, मुख प्रक्षालन होऊन कोठें देवाला नमस्कार होतो न होतो तों मुलांनी उठून रडण्यास सुरवात केली. आतां दुसरें कामच नाहीं, तर आधीं कोठचें काम तें पहा.

## कडवें दुसरें.

शिशू बाळ तें अज्ञपणानें मुतलें आंथरुणीं ।
तें नेऊनी वाळत घालितें तों उगवे तरणी ॥
ह्मणे एकमज घेई कडेवर अन्य वदे खाऊं ।
तिसरें मूल ह्मणे आई चल भूर आपण जाऊं ॥
ह्मणति कन्यका घाल वेणी दे अंग धुवायाला ।
पाणी सत्वर तों पती ह्मणे घे ह्या तनयाला ॥
चहा करी झरझरा जमविल्या कोप बशा जवळ ।
गाळुनि सर्वांलागीं देतसे गेला उषःकाळ ॥

**चा० ब०**— पोतेरें राहूनी गेलें ।
भांड्यांचे आवे बनले ।
झाडुनी अजूनि न झालें ॥

**चा० प०**—अशी सरसवी भातही ठेवी जरा इथे गंदी।
परी मुलें जेवणासाठीं करिती अंदाधुंदी ॥
करा स्त्रियांनो हा सूविचार मी तरेन कशी जलधीं॥ २ ॥

**अर्थ**— लहानच मूल तें, रात्रभर अंथरूणांत मुतलेलें ह्मणून पहिलें काम, आधीं तीं मुतोलीं वाळत घातलीं, तों सूर्य उदय पुरता झालाच. मग काय विचारतां, सर्व मुलांनीं जिकडून तिकडून एकच गोंधळ केला. कोणी ह्मणे कडेवर घे. कोण ह्मणतें खाऊदे. तिसरें तर तिसऱ्याच पंथाचें. तें भूर जाण्याबद्दल पाठीशीं उभें! मग आतां कसें करावें? व काय करूं असें ह्मणत आहें, तोंच एक मुलगा होता पतीमहाराजांच्या जवळ. उठल्यापासून त्यांनीं संभाळलेला. ते आले ताव झाडीत. कायग, तुझें अजून आटोपलें का नाहीं? याला घे बघूं आधीं. मी काय हेंच काम करावें? किंवा कसें!! मधें एक भानगड आहेच. जर मुली असल्या तर मात्र खरें पाप. कोण ह्मणे वेणी

घाल, दुसरी ह्मणते न्हाऊं घाल. आई, नाहीं तर आंगधुवालातरी पाणी दे. सखू व यमू बघ केव्हांच आंग धुऊन आल्या. काय करते बिचारी. देह दमला अथवा गुंगला कोणाला सांगेल. मग एक करते युक्ति, चहा करायचा व सर्व मंडळीना देऊन जराशी उगी करायची झालं. पण त्यामुळें काम किती राहिलें तें पहा. सकाळची वेळ तर निघून गेली. पोतेरं राहिलंच. भांडीं खूपशी होऊन पडलीं, पण घासाला वेळ नाही. केरसुणीच्या जवळ जाण्यासही मिळालें नाही, मात्र अंघी तरतरीत करून सकाळचा भात वगैरे ठेऊन जरा मनाला स्वस्थता घेत आहे, तोंच मुलांची जेवणासाठी अंदाधूंदी, भांडणें, रडणी, सुरू झाली. ( स्वगत ) छे!! नकोरे देवा पुन्हा हा जन्म. सर्व कृतकर्म आतांच संपलें !!

## कडवें तिसरें.

त्रिकाळ पैकीं एक वेळ गत नाहीं वेळ झाला ।
श्री हरि स्मरण भजन पूजन केव्हां करूं बोला ॥
भाजी वघूंदे तांदूळ घेऊं काढीन हीं रुष्टीं ।
इतुकें होतां मना दमुनीयां झाली तनु कष्टी ॥

परि चालेना केल्याविण हें मग उठली तेव्हां ॥
कचीत वालकां दूध पाजिते रडत असे जेव्हां ॥
चा० ब०— कधी भांडीं घाशीन बाई ।
करीं धुणी धुवाची घाई ।
पाण्याविण चालत नाहीं ।

चा० प०—
झाला बहूतची उशीर मनिं ह्मणे करिन आतां गरदी ॥
येतां घरीं पति पुत्र चुलीकडे पाहतील ते आधी ॥
करा स्त्रियांनो० ॥ २ ॥

**अर्थ**— झालं एवढें होतें न होतें तों सकाळची एकवेळ ईश्वरस्मरणा विरहीत अशी गेलीच. आतां पुढच्या दोन वेळाच उरल्या. त्यांत भाजी बधून घेऊंदे, तांदूळ मोजून घेऊन आणले पाहिजेत, मुलें जेवलीं तीं उष्टीं तर केव्हांपासून पडलीं आहेत. असें काम पुष्कळसें दिसलें ह्मणजे जरा कंटाळा येऊन जीव ठकतो. पण इलाज काय? केल्याशिवाय तर मुळींच चालत नाही. काम करूं लागली तों तान्हें मुलाला पाजाची वेळ झाली. [ स्वतःस उद्देशून ] वाहवा, काय पण संसारसुख!! ऐकालाही नको, मग लिहिण्यास

कोठची आवड. पण काय करूं, कांट्यानेंच कांटा काढला पाहिजे. त्याप्रमाणें संसारांत उपरती–संसार करून अथवा बघून किंवा लिहूनच आलेली बरी. तथापि एकदां का मन विटलें ह्मणजे अजीबात वीटेल. निदान शीक्षित सुज्ञ भगीनी तरी ताळ्यावर आल्याच पाहिजेत असा अंदाज आहे. यालना? का माझा तर्क फुकट जाईल? असो, असें करतां करतां सूर्य सारखा चालल्यामुळें दुपार होतच आहे. विच्यारही घोळतातच. हीं भांडीं केंव्हाही घाशीन, तरी पण धुणी मात्र घाईने धुतलींच पाहिंजेत, पाण्याशिवाय तरी कसें चालणार? तें आधीं आणु का, असा विचार न झाला तोंच आठवलें. कसलं कायनी कसलें काय!! पुष्कळच उशीर झाला. आतां गरदीनें स्वयंपाकालाच लागलें पाहिजे, कारण, घरीं येण्याची वेळ होऊन गेली, आतांच सर्व मंडळी येतील. मुलाचें जेवण वेळेवर न झालें तर तो चुलीकडे आधीं पाहून मला तोंडांत टाकील. आतां सर्व काम राहिलं. फक्त जेवाचेंच करतें झालं! (स्वगत.) काय हें चरित्र,, तरी सुद्धां हौसना !! धिग् जिणें !!

## कडवें चवथें.

दूध निघालें नाहीं तापलें कैसें करूं आतां ।
जाईल नासुनी उशीर जाहल्या उद्भवली चिंता ॥
नाहीं आधींचें ताक आतां मी वाढुं काय बाई ।
लगबगीने मंथन आरंभी लोणी काढी घाई ॥
तों शाळेंतुन मुलें आलीं पती ओटीवर येती ।
काय तुला गे दिसत नाही का वेळ जहाली ती ॥

**चा० ब०**— चुलि वरती लाऊनी भाजी ॥
करि झरझर कामें जीं जीं ॥
जरी असलि मुलांची आजी ।

**चा० प०**—
तरी तिज गांजी म्हणे यमाजी ने हीजला आधी ।
काय करूं मी किती कुणाचें सोसत ना व्याधी ॥
करा स्त्रियांनो० ॥ ४ ॥

**अर्थ**—सगळं मुसळ केरांत. दुध केव्हांपासून निघालें आहे, तापलें नाहीं, तें नासेल की काय कोणजाणे. असो पण तें ताक तरी वाढापुरतें आहे की नाहीं. छे तें नसायचंच, केलें पाहिजे. एकदां कसेंतरी गरदीनें ताक केलें, घाई घाईनें लोणी काढलें,

अ॰ १०२

( पण तिथें फार घाई नसते, कारण घाई केल्यास नुकसान होईलना, तें कसें चालेल. ) असो इतकें होतें तों शाळा सुटली. पतीराज ओटीवर आले नाहीं तोंच माजघरांत पान दिसलें नाहीं, ह्मणून ओरडले. कायग, वेळ झालेली दिसत नाहीं का? मी उपाशीं जाईन हो. हें समजून ऐस. कर्म, घाबरली झालं! कसलीमसली भाजी चुलीला लावली, व झरझर कामें राहिलेलीं तीं उरकून टाकण्याचें मनांत आणलें, व तें उरकीलसुद्धां. पण यांत जर मुलांची आजी असेल तर मात्र तिला यमाजीला नेण्याविषयीं प्रार्थना करावी लागते. या सर्व उपाधी सोसतात, पण सासूची उपाधी जड होते. मग ह्मणते, बा यमाजी, तूं आधीं पहिलें काम हें कर, माझ्याकडे बघ, कितीरे मी उपाधी सोसूं? तुजकडे ने या सासूला, चालेल. आतां यांचें काय व्हायचें राहिलें आहे? मरणालाच विसरल्यां आहेत. तुझ्याकडे असल्या निरुपयोगी माणसांना जागाच नाहीं कीं काय? कसें तरी करूं, सांग बाबा. मी तर थकलें बरें!! अशी प्रार्थना सूर्यसुतानें लवकर ऐकिली तर बरी. नाहींपेक्षां असा त्या ह्मातारीला त्रास होतो कीं तो वर्णन करवत नाहीं. [.स्वगत ] नकोरे देवा तें वृद्धपण व सुनांचे

तरवारीसारखे तीक्ष्ण बोल!! बाकी मी मात्र एक जन्म त्या जाचांतून सुटलें आहें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. चुलत सून येईल, पण तें निराळें. असो असें तिला कोणतेंही काम जास्त झालें ह्मणजे तें न सोसल्यामुळें ह्मातारीवर राग काढते झालें.

## कडवें ५ वें.

काढी लोणचीं वाटुन चटणी हेत मनीं ऊरला।
कालव हें रायतें सुनेला हुकुम असा केला ॥
भाजी भाकरी शाखा बहुपरि अन्न सिद्ध केलें ।
मुलांलेकरां उगे करी ह्मगे पोर भुकेलेलें ॥
ब्रह्मदेव जरि सृष्टी करि तरी असल जरा स्वस्थ ।
त्याहून जणु वाटतें बायकांना आमचें जास्त ॥

**चा० ब०**— परि जाईल सर्वही वाया ।
सुज्ञहो शुद्धीवर या या ।
कां जाता फुकट अशा ह्या ।

**चा० प०**—

आयुष्य खाया काळ जपतसे माजि नसे अवधी ।
राव रंकना ह्मणे शेवटीं नेईल तो जलधी ॥
करा स्त्रियांनो० ॥ ५ ॥

५८

**अर्थः**- आतां पहा, एकच भाजी कशी वाढूं ह्मणून लोणचं काढलन. चटणी वाटली व रायतें करण्यास सुनेला सांगितलें ( सून ह्मणजे तारतम्यानें दुसरीं कोणीही असें ह्मटल्यास चालेल. कारण सर्वांनाच सुना कोठें आहेत? पण मुली, बहिणी, मावशी, आत्या, वगैरे दुसरें माणूस असें समजावें. ) अजून अंघोळीला गेले नाहीं. मग जरासा धीर आला. भाज्या केल्या, भाकरी भाजल्या, नंतर सर्व अन्न सिद्ध झालें. मुलांना दुसऱ्या जेवणाची भूक लागली. पण थांबवून घेऊन सांगते कीं, खरंच भूक लागली, पण थांबाहो, अंघोळ होऊंदेना? वाहवाग सुनबाई !! मुलांचा, नवऱ्याचा, कामाचा, व तुझा स्वतःचा असा कशाविषयींसुद्धां कंटाळा येत नाहीं, पण सासूबाईंना मात्र कंटाळतेसका? धिग् जिणें असल्या सुनेचें!! ( स्वगत ) गोष्ट कल्पित खरी, पण खरा प्रकारही तोच दिसतो. मग बोलाला कुठली हरकत आहे? अहो, अशा संसारांत असतांना स्त्रियांना काय गर्व होतो व अभिमान चढतो ह्मणून सांगूं!! बोटभर स्वर्ग उरतो, पण तोच हातीं येत नाहीं. ब्रम्हदेव सृष्टीची घडामोड करतो, त्यालासुद्धां जरा वेळ रिकामा असेल, पण बायकांना त्याच्या

पेक्षांहि आमचें काम जास्तच असें वाटतें. कशावरून तर ईश्वरालाही विसरल्या आहेत त्यावरून. स्त्रियांनों, पहाहो, सर्व वायां जाईल बरें. कारण हें शाश्वत कोठें आहे? मुळचेंच नश्वर!! सुज्ञानी स्त्रियांनों, शुद्धीवर या. मनुष्य जन्मांत येऊन फुकट कां जाता? फुकट ह्मणजे कसें विचाराल तर तुम्हीं ईश्वराला न ओळखिल्यामुळें तुमचें आयुष्य तो काळरूपानें मोजीत आहे. व काळ फार जपलेला असून तुम्हीं राव असा रंक असा, शहाणें किंवा वेडे, लहान मोठे, काळे गोरे, जात कुळ वगैरे कसेंही असो, तो तें न पाहतां इतक्या जलदीनें नेईल कीं, तुम्हीं मग फस्तावीं पडाल. ह्मणजे त्याच्या ताब्यांत गेल्यावर विचार येईल, पण मग काय उपयोग? करितां भगिनीनो, या संसारा विषयीं निरहंकारी बना व परमेश्वराला शरण जाऊन ज्ञान मिळवा.

## कडवें ६ वें.

दे मज पाणी धोतर आणी कर इकडे साबू ।
कां रडतो हा विनू तसा तो रुसला असे बाबू ॥
एसें पति ह्मणे परी न आयके झाली बहु घाई ।
तों आला एक मित्र पाहुणा जणू असे व्याही ॥

कांहीं राग मनिं कांहीं हर्ष परि चुकत नाहीं करणें ।
फार झालें तर टाकुं शेवटीं पूजा जप स्मरण ॥

**चा० व०**— तुळशीला नाहिंच गेलें ।
जप कैसा तोहि विसरलें ।
पोथीचें भान न उरलें ।

**चा० प०—**

प्रदक्षणा कधिं घालित असतां प्रपंचांत बुद्धी ।
व्यग्र असे मग ध्यान कशाचें न कळे हरिशुद्धी ॥
करा स्त्रियांनो० ॥ ६ ॥

वेळ होतांच पतीनें अंघोळीला पाणी मागितलें. तिथें खरें ह्मटलें ह्मणजे धोतराची तयारी हवीच. साबू ठेवायचा चुकला. पण खुशीनें तो मागून घेत आहेत, इतक्यांत विनू रडूं लागला. ह्मणून तो कां रडतो असा प्रश्न केला. तसाच बाबू कां रुसला आहे, असें पती पुष्कळ प्रकारें बोलून पहात आहे, पण हिला वेळ कोठचा? हिची सदाच धांदल. बोलायलाही अशा वेळीं फुरसत नाहीं. कसलें तरी चालतां चालतां निमित्त सांगून घरांत गेली. पानें वाढूं लागली, तों परत विघ्नच ओढवलें. ओटीवर एक पाव्हणा बसलेला

पाहिला. तो होता नवऱ्याचा मित्र. मग काय, त्याही एकीकडे व जांवई भलतीकडेच, आसा त्याचा थाट!! विचारी करेत काय. कांहींसा राग आला. पण हर्षरोख दाखऊनच पुढील काम करणें भाग पडलें. तिनें मनाची समजूत केली, मी जरी रागानें केलें तरी मेहेनत चुकत नाहीं व लोभानें केलें तरी त्रास आहेच. मग उगीच राग तरी कशाला? आतां आजचा दिवस पूजा, जप, स्मरण वगैरे सर्व राहिलेंच. राहूंदे परतें. काय काय तरी एकटें माणूस करील? हीं कामें रिकामपणचीं आहेत झालें!! मग तुळशीला तर गेलीच नाहीं. जपाचें नांवही आठवलें नाहीं. पोथी तरी सोडून काय उपयोग? ती वाचायला वेळ नाहीं व तिचें भानही नव्हेंच. कशामशा प्रदक्षणा मात्र घातल्या. पण त्या घालतांना मनानें प्रपंचाचेंच चिंतन, मग ध्यान कसलें आन् धारणा कशाची!! भगिनींनो, आशा आपल्या वर्तन क्रमानें ईश्वराची शुद्धि आपणास कशी कळावी? हें तुह्मीच पहा. ह्मणूनच माझें सांगणें आहेकीं या संसारांत वेळ मुळीच कधी मिळणार नाही ह्मणून तुह्मी त्यांतल्या त्यांतच विचार करा व हित पहा.

## कडवें ७ वें.

करिती कशिमशि देवपुजा तों ह्मणती पान वाढा ।
वाफ-द्यावया वेळ न भाता भाकरिचे पाडा- ॥
तुकडे इकडे गडबड उडली मुलांलेकरांची ।
ह्मणे नाहीं मम साम्य संततीवान् मी दैवाची ॥
कसा देव तो स्वप्निं न येई गुंतुनि व्यवसाया ।
हाहा दैवा कशा आह्मी तरि मूढ अशा जाया ॥

**चा० ब०**— चविपरिनें भोजन झालें ।
भांड्यांचें संकट आलें ।
मग शूद्रेवर संपविलें ।

**चा० प०**—

खाल्ली सुपारी पडा दुपारीं झोंपेची धुंदी ।
आली दुजि गत वेळ न मिळाली सुविचारा संधी ॥
करा स्त्रियांनों० ॥ ७ ॥

**अर्थ**— सर्व कामें करतां करतां उशीर झाला, व भुकेनें जीव गुंडाळूं लागला. मग देवपूजा कितीशी धड होईल? हें सांगण्यास नकोच. एकदां कशीमशी पूजा केली. जेमतेम भाताला वाफ आली न आली तों पानें वाढायची गर्दी झाली. भाकरी मोडल्या. तुकडे केले. मुलाबाळांची गडबड बोलूं नका. मग अशा

थाटांत असतांना स्त्रियांस असें वाटतें कीं, देवा, माझ्या सारखी असें संततीचें सुख भोगणारी कोणी असेल का? खरोखर मी पूर्ण सुदैवीच खरी. ( स्वगत ) पण उद्यां एकादा मुलगा गमावला ह्मणजे तूंच दुर्दैवी ठरशीलना? असो, ह्मणून ईश्वरी देणगीचा अथवा नेमलेल्या ईशकर्तृत्वाचा ह्मणजे सुदैव किंवा दुर्दैव यांचा गर्व मानूं नये. मात्र उलटें असें समजावें कीं, हे देवा, या अशा व्यवसायांत गुंतल्यामुळें तुझें स्मरण स्वप्नांतही आह्मास होत नाहीं, तरी तुझी कृपादृष्टी असावी, असें एकवार जरी ह्मटलें तरी पुरे. पण तेंही होत नाहीं. खचितच मूढ जात अबलांची यांत संशय नाहीं. व ह्मणून त्यांच्याच पाठीशीं संततीचे उत्पत्तीचीं व पालणपोषणाचीं कामें ईश्वरानें संपविलीं आहेत. असो. चवीनें छानदार असें जीवाला सुख देणारें भोजन झालें. पण काय तें हातींपायीं आलं, कंटाळा आला भांड्यांचा. मग काणपीण ठरविली व तिजकडे तें काम गेलं. सुपारी खाऊन दुपारीं झोंप घेतली तों दुजी ह्मणजे दिवस मर्यादेच्या तीन प्रहरांतून २ वेळा तर गेल्या, पण जरा फट मिळाली नाहीं, कीं ज्यामधें तरी परमार्थ बाजूचा विचार मनांत येईल. छे संधीच नाहीं!!

## कडवें ८ वें.

निजुनी उठतां करी च्याहा मग घाली तेल वाती ।
असतां गो महिषी त्या खाण्यासाठीं हंबरती ॥
करी शेगडी केरहि काढी तांदूळ निवडूंदे ।
एका मागुन एक सूचती प्रपंचांत धंदे ॥
नाहीं दशमिचें पीठ मूठभर घालुन मग जातें ।
डाळ गहूं तांदूळ दळितसे आठ दिसां पुरतें ॥

**चा० ब०**— तों येई शेजारिण गे ।
काहीं तरि उसने मागे ।
किति सांगुं उपाधी मागें ।

**चा० प०**—

बोले सुख दुःखाच्या गोष्टी मुलगा मम फंदी ।
वदे तिला मग आपुली काहाणी बघुन बरी संधी ॥
पहा स्त्रियांनो० ॥ ८ ॥

**अर्थ**— काय पहा, वेळाचें टाईमच लागून गेलें आहे. निजून उठते तों मधल्या चहाची वेळ झालीच, तो केला. तेलवाती होऊन, असल्यास ढोरागुरांचीं खाणीं सिद्ध केलीं पाहिजेत. ढोरेंनसलीं तर पोरांचीं तरी हावींतना? शेगडी करून केर निघतो

तों उद्यांचे तांदूळ निवडण्याची आठवण होते. असें एका मागून एक कसें सुचतें पहा. उद्यांना सकाळला —पीठ नाहीं, मग जातें घातलं. डाळ, गहूं, तांदूळ वगैरे नित्याचें दळण आठ दिवस पुरेल इतकें दळून झालें न झालें तों एक शेजारीण बसायला आली. झालें!! हाच कुठे पोथी वगैरे वाचण्याचा वेळ, पण आतां पुढील हकीकती मुळें तोही व्यर्थच जाणार. ती कांहीं तरी उसनें मागण्याच्या उद्देशानेच आली होती. तेव्हां ती आपल्याला उपाधीला कारण होऊन स्वहिताचा नाश करण्यासच आली असें मनांत आणून तिला काय हवें होतें तें देऊन वाटेस लावायची ना? पण अशा शेजारणी जवळ जवळ जमल्या ह्मणजे मग काय विचारता? हिनें आपल्याच रडकथेला तिच्या जवळ सुरवात केली. सबंध दिवस काम करीत असतांना मनांत घोळत होतें व कोणाजवळ तरी सांगेन असें वाटलें होतें तों ही संधी बरी आहे ह्मणून खालील प्रमाणें सांगू लागली.

## कडवें ९ वें.

काय सांगूं या संसाराची वार्ता अवघड गे ।
सखे साजणी वाटतसे मनिं तड कैशी लागे ॥

मुली येती सांगून परी ती मुलगी बहु मोठी ।
झाली ह्मणुन ठेविलें असे पुत्राचें लग्न खोटी ॥
मुंज करीन परि लाभत नाहीं चिंता उद्भवली ।
काय करावें हरिचि परीक्षा नापासाचि झाली ॥

**चा० ब०**— व्यासंग बहू पोटाचा ।
मध्यें गुंता तनुज्यार्थांचा ।
वेळ ना मिळे घटकेचा ।

**चा० प०**—

वहिण न भेटे भाऊ तरि कुठे न कळे मज शुद्धी ।
ऐशा श्री हरिविणे बाळगी हृदयामध्यें आधी ॥
करा स्त्रियांनो० ॥ ९ ॥

**अर्थ**— काय बोलूं नि काय सांगूं. घरोबर कांहीं तरी हकीकत आहेच बरें. कशी यांतून तड लागून एकदां सुखानें मरण येईल असें झालें आहे, खरोखरच हो !! दामुला मुली सांगून येत आहेत, पण सोनी मोठी झाल्यामुळें त्याचें आधीं लग्न करतां येत नाहीं. बरें महादेवाची मुंज यंदा करून घेतली असती पण त्याला लाभत नाहीं. दुसरी अशी एक चिंता उत्पन्न झाली, हरी नापास झाला. पैसा व अभ्यास

फुकट जाऊन नोकरीचें कुठे जुळेल किं नाहीं हा घोर!! बरें त्यांतलेत्यांत पोटाचे उद्योगामध्यें जर व्याधिग्रस्त झालों तर मग पंचाईतच. असें एक का, अनेक घोर आहेत!! हें पहा, पुष्कळ दिवसांत बहीण नजरेस पडली नाहीं, कारण जाण्याला वेळच नाहींना. भाऊची कुठे बदली झाली आहे कोण जाणें. अशा प्रकारच्या देहानें नाहीं तर मनानें वेळ निघून जाण्याला उपाधी आहेतच. पण काय करावें? सर्वांच्या मागें हें दुःख लागलें आहेच. मात्र या आधि ह्मणजे मानसिक कल्पना उगाच बाळगतों. यापेक्षां जर याच कल्पना ईश्वराकडे निरपेक्षतेनें जातील तर काय नुकसान होईल? पण नाहीं. हेंच गोड वाटतें. धन्य या अबला-वर्गाच्या अज्ञानपणाची!!

## कडवें १० वें.

गतसुहृदांची वार्ता काढुनि पोटभरी रडली ।
तों आलें एक पत्र माहेरीं हवा बिघडलेली ॥
चिंता उद्भव माहेरच्यांचा चैन कदां न पडे ।
गेली मनी सासऱ्यां कांहींसें जाई मन तिकडे ॥
दारिद्र असतां सुखनच चित्ता असला जरि पैसा ।
कैसा करूं व्यय तस्करांचें भय सुचूं न दे सहसा ॥

१८३१

**चा० ब०—** यमुनेचे हालचू भारी ।
सदु नेहमीं असतो अजारी ।
घरिं स्वभाव रागिट भारी ।

**चा० प०—**

ऐशा एक अनेक परीच्या गोष्टी वदत तधीं ।
गेली वेळा तिसरी निघोनी आयुष्याची अवधी ॥
करा स्त्रियांनों० ॥ १० ॥

**अर्थ—** मागील कडव्यांत वर्णन केल्याप्रमाणें एकमेकींच्या मानसिक व्यथे बद्दल बोलणें झालें. आतां त्याच प्रमाणें बोलण्या बोलण्यावरून मेलेल्या माणसांची वगैरे गोष्ट निघाली. मग काय विचारता !! जेवढी कोणी सुहृद मंडळी गत झालेली होती तेवढ्यांचें स्मरण झालें. रडें आवरेना. ( ह्मणूनच कोणाची आठवण न काढतां त्या बद्दल कोणा जवळही बोलूं नये. कारण त्या दुःख स्थितीचा अनुभव घेऊन जर मन कलुषित झालें तर तें व्यवहारिक, अथवा परमार्थिक कांहीं काम धड करूं देत नाहीं. ) असो, जरा रडें कमी होतें न होतें तोंच एक पत्र आलें, कीं माहेरच्या गांवची हवा बिघडली आहे. वाहवा,

आतां तर सीमाच झाली. चिंतेचा उद्भव खूपच बळावला, तो चैन पडूं देईना. मुलीला सासरीं जाऊन ही बरेच दिवस झाले होते, तिकडे तर सारखें लक्ष जात आहे. कारण मुलीवरची आईची माया किती असते हें कोणासही सांगण्यास नकोच. आतां येवढें झालें, पण दारिद्र असेल तर सुख बोलायला नको. बरें पैसा जरी असला तरीही सुखाचा अभावच. कारण त्याचा व्यय कसा करूं, कोठें ठेऊं, चोरी होईल कीं काय, कोणी मागणार नाहींना, वगैरे अनेक कल्पनातरंग रात्रंदिवस मनांत घोळत असतात. तेंहि असो. एका मुलीचे हाल होतात ते पाहवत तर नाहींच, पण ऐकवतही नाहीं. मुलगे तरी बरे आहेत, छे!! सदू तर सदा आजारी. बरें, सगळें दुःख सोशीन, पण घरांतील स्वभाव तरी धड!! तेंही नाहीं. राग तर मला फार छळीत आहे. काय बरें करूं? सखे मैत्रिणी तूं पुष्कळ सुखी आहेस बरें. मला मात्र सर्वतोपरी वेड लागण्याची वेळ आली आहे, समजलीस. अस्तु असें एकमेकीचें संसाराच्या सुख दुःखाचें बोलणें झालें. हाच वेळ कुठे रिकामा होता,

तोहि ह्या भाषणांत फुकट गेला. आतां मात्र दिवस उरलाच नाहीं. तिसरी वेळ गेली. आयुष्याचा दिवस कमी झाला.

**कडवें ११ वें.**

संसारामधें नसतां पैसा काय सांगू काहाणी ।
दरिद्राहुनी खिन्नता नसे मान न दे कोणी ॥
आजि आई वहिणी मुली आत्या काकू मामी सजणी ।
न येति आपुल्याकडे आपुली आवडेना करणी ॥
काका आजोबा मातुल भाऊ व्याही जांवयांनीं ।
दरिद्र पाहुनि चेष्टा करणें स्थिती लाजिरवाणी ॥

**चा० व०**– परि किती मनाला ओढ ।
करुं काय ह्मणे या तोंड ।
इंद्रियांचें पुरवी कोड ।

**चा० प०**—
कैशि असो स्थिति परी उपरती नाहीं मनीं अगदीं ।
ईश्वरि प्रेमाविण या गोष्टी आपलें आपण वादी ॥
करा स्त्रियांनों० ॥ ११ ॥

**अर्थ**– मनुष्याला सर्व स्थिति पत्करते. पण दरिद्र असेल तर त्यासारखा दुःखी कोणी नाहीं. पहा,

दरिद्र हा एक खिन्नपणा असून त्यामुळें आपल्या आप्त-जनांकडूनही आपणांस मान मिळत नाहीं, मग लोकां-कडून कोठला मिळालायला? आजि, काकू, मामी, आत्या, वहिणीं वगैरे व शेजारणीसुद्धां दारिद्र असेल तर आपणास टाकून जातील. मात्र आईला मुलीचें प्रेम दरिद्र असूनही असतें व श्रीमंत असूनही अस-तेंच. बाकीच्यांची गोष्ट मात्र वरीलप्रमाणें. असो, हा स्त्रीवर्ग झाला. पण पुरुषस्वजन ह्मणजे काका, मामा, मामेभाऊ, आतेभाऊ, व्याही, जांवई वगैरे आपले जे लौकीकाचे नातलग त्यांचे मानपान सणासु-दीला यथास्थित न झाल्यामुळें हांसून ते आपली चेष्टा करण्यासही कमी करीत नाहींत. मग इतर जन हांसतील यांत काय नवल!! ही दशा लाजीरवाणी नव्हे काय? पण आपलें मन किती द्वाड. त्याजबद्द-लचीच सर्वतोपरी ओढ धरून इंद्रियांचें कोड पुरवीत वसतें. कितीही दुःखदस्थिति!! अशी स्थिति असली तरी ईश्वराला न ओळखतां आपले आपणच वादी होऊन संसार करीत वसतों. पहा, यापेक्षां वादी तो आणखी कसा असतो. एकवेळ बाह्य शत्रूही पुरवला, पण हा अंतरशत्रूच कठीण बरें!!

## कडवें १२ वें.

अहो राहिलें मुख्य बायकांचें कामची सर्व ।
जें निघतां वाटतें स्त्रियांना आलें महापर्व ॥
पोहे भाजणी मेतकूट चिकवड्या मसालाहो ।
फेण्या मिरगुंडेंहि कुर्डया खाण्याचा लाहो ॥
पापड कोंडेकर्डे लोणचीं मिरच्या तळण्याला ।
भातवड्या तिळवड्या साणगे रांधाचे घाला ॥
करी सांडया तिळकुट खाया ह्मणे मज आवडतें ।
मात्र हरिच्या स्मरणीं पूजनीं झोंप बहू नडते ॥

च्चा० ब०— हें कार्य अजाणपणाचें ।
मागुनी दुःखच याचें ।
वास्तव्यच अविचाराचें ।

चा० प०—
मनीं ह्मणुनियां सारासार न घेई चित्तिं कधीं ।
ह्मणे मेल्यावर मोक्ष आयता नसे आतां अवधी ॥
करा स्त्रियांनों० ॥ १२ ॥

**अर्थ**०— मागिल कडव्यांमधून नित्य क्रम व मानसिक ताप वर्णन केले गेले. पण तें राहूंद्याच. अहो, स्त्रियांच्या आवडीचें व जें काम निघाल्यावर

णणू काय एखादी पर्वणीच आली आहे असें जाणून आंगधुणी वगैरे लवकर लवकर आटोपून घेऊन सर्वजणी कशा कामांत गुंततात तें पहा. मुख्य पोहे आपलें व दुसऱ्याचे– तशीच कधीं भाजणी तर कधीं मेतकूट. कधीं चिकवड्या तर केव्हां मसाला. फेण्या काढायच्या. सिरगुंडें कूडया हव्याच असतात. पहा सर्व खाण्याचा हव्यास. पुरेसें कुठे होत आहे!! पापड, कोंडेकडें, मिरच्या फोडणीच्या व भरलेल्या तळण्याच्या सुद्धां; तशांत पुरोठ्याला भातवड्या, तिळवड्या, रांधाचे सांणगे; त्यांतलेत्यांत सांडयाही आहेतच. तिळकूट तर फारच आवडीचें. असो, असे सर्व पदार्थ कसे रात्रंदिवस झटून करीत आहों. पण ईश्वराचें पूजन, स्मरण, भजन, वाचन, वगैरेची वेळ आली ह्मणजे मात्र झोंपेनें डोळे गुंगलेच समजा. आहो, हें काय शहाणपण? छे, मुळींच नाहीं. सर्व अज्ञानीपणा. पण त्याचें फळ काय, तर सर्वतोपरी दुःखाला कारण. अविचाराच्या अतीशय वास्तव्यामुळें असें होत आहे. व ह्मणूनच सार काय व असार काय हें तत्व न समजून उगीच घमेंडीनें बोलतों, किं जाऊंदे

पर्ता वेळ, मला जरी किती कुणी बोध केला तरी आतां तर वेळ नाहींच, पुढच्या जन्मीं पाहूं. पण मेल्या-वर जन्म कसला नि काय कसलें. मोक्षच आहे झालें. ( स्वगत ) वाहवा, हिच्या काकानें मोक्ष ठेविला आहे काय? मोक्षाच्या ऐवजीं नर्क मात्र आहे हें खास.

## कडवें १३ वें.

( स्वगत— काय काय लिहूं, पण लिहिलेंच पाहिजे. एरवीं कळणार कसें? )

मूग धूतले वाल घेतले आले पावटेही ।
काय सांगूं या दोन मासिं कडधान्याची घाई ॥
निवडित चंवळ्या तुरी भरडल्या गहुं आणा ह्मणती ।
तीळ वाळवी कुळतांमाजी फार खडे माती ॥
घेऊन मटक्यादिक वाटाणें उणें नसे कांहीं ।
एक हरीच्या स्मरणावांचुनि चुकत कुठे नाहीं ॥

**चा० ब०**— कडधान्य सर्वही आलें ।
वालही निवडुनि झाले ।
हरभेरे काल भरडले ।

**चा० प०**—

कांहीं डाळि निवडल्या तयांचें आहे अजुनी चिपट ।

वाळऊनी तें भरडिन परवां दवडुं कसें फुकट ॥
बहुमोलाचें आयुष्य वेंचे नाहीं त्याची शुद्धी ।
कवडी कवडी जपतों फुकट न जाऊं देत कधीं ॥
करा स्त्रियांनों० ॥ १३ ॥

**अर्थ**— फालगुना पासून तों वैशाख ज्येष्ठापर्यंत काय सांगूं, बायकांची जी धांदल उडते ती पराकाष्टेचीच होय. कसली तर डाळदाण्याची. दुसरें काय असणार? मूग धुवायचे, वाल निवडायचे, पावटे आलेच आहेत, चंवळ्या केव्हांतरी निवडाव्या हा विचारच. तुरी भरडून झाल्या, गहूं मात्र आणवले पाहिजेत. तीळ जर वाळवले नाहीं तर नासतील. कुळीथ ऊर्फ हुलगे निवडतांना जीव कंटाळला. किती तरी खडे व माती ह्मणून ते निवडायला फारच वेळ मोडला. मटक्या घेतल्या, वाटाणे पण आणले, आतां मात्र जीव थंड झाला. कोटचाही पदार्थ नाहीं असें नाहीं. सर्व आहे. पण स्त्रियांनो, ईश्वरस्मरण मात्र नाहीं बरें!! कोठेंही चुकल्यात नाहीं, तरी येथें मात्र चुकत आहा. असो. सर्व धान्य आलें. तें व्यवस्थित निवडून होईलच. पण वाल कधीं होतील

ते खरे, कारण तें पुष्कळ आहेत. हारभरें काल भरडले ह्मणून एक उरकेंल तरी. पण आजून डाळी निवडण्याचें चिपट थोडेंसें आहे. असूं दे. पुरत्या निवडून झाल्यावर सर्व एकदम परवांचे दिवशीं भरडीन. फुकट घालऊन कसें चालेल? काय मूर्खपणा हा!! अतीशय मोलाचें ह्मणजे लक्ष चौऱ्यायशी योनी हिंडूनही न मिळणारें भांडवल जो देह तो फुकट जात आहे, त्याची शुद्ध सुद्धां नाहीं!! आणि चिपट फुकट कसें दवडूं हें सार्थक करीत आहे. अशा अज्ञानापेक्षां जास्त मूर्खपणा तो काय? तुह्मींच सांगा बरें?

## कडवें १४ वें.

लवंग वेलची धणे दालचिनी जिरें हिंग आणवी ।
मोहऱ्या मेथ्या निवडि जलदिने शिसे भरुन ठेवी ॥
संसाराचें धोरण मोठें अभीमान हृदयीं ।
उणे न कोठें ह्मणे माझें वघ तुझें असें नाहीं ॥

**चा० ब०—** बहिणीला देईन कांहीं ।
तें करण्याला लवलाही ।
उडतसे किती तरि घाई ।

चा० प०—

पाक नारळी दुधही आळी दहीं सुखवि जलदी ।
नणंदेचें कुणि नांव काढितां उठे कपाळ तधीं ॥
करा स्त्रियांनों० ॥ १४ ॥

**अर्थ**— मागील कडव्यांत डाळ दाण्याचेंच विवेचन झालें. पण किरकोळ राहिलें तें कुठे जाईल? सांगतें ऐका बरें!! पावसाळ्या करितां संग्रह पहा. लवंग, वेलची, धणे, दालचिनी, जिरें, हिंग, सर्व कांहीं आणलें. मोहोऱ्या, मेथ्या, निवडल्या वाळल्या शिसे भरून यादी घालून ठेवले. मग जिवाची धन्यता मानिते व शेजारणीला कांहीं टोंचूनही बोलते. कायग, हें पहा माझें काम कसें आहे तें, तुझें असें नाहीं. अहो, निष्फळ उपाधींना काय तोटा? त्यांतल्यात्यांत वहिणी भावांना खाऊ करून धाडतेच आहे. नारळीपाक तर हातोहातीं होतोच. दहीं सुकवणे व वड्या करणें तर मुळींच कठीण नाहीं. पण नणंदेचें नांव काढा कीं कपाळाची शीर उठलीच समजावें. खरोखर दुष्ट स्त्रीजातीचा स्वभाव!! कायहो, एक विसरलेंच. व्याही जांवयांकरितां मुरांबा करून

ठेवायला नको का? व जर एकादा घाईनें पाव्हणा आला तर वाटींत घालून तोच पुढें करीन. कारण कोणी चहा होईतों न थांबला तर हा बरा!!

## कडवें १५ वें.

( स्वगत-वरील काम उन्हाळींचें झालें. पण पावसाळी कांहीं हें काम नसतें व सर्व बाजूनीं काम कमीच होतें, पण रिकामा वेळ मात्र नाहीं. कारण- )

कांहीं काम नसलें तर चोळ्या परकर बेतिन गे ।
तों माता रिति बघुनि बालकें ह्मणति मला घे घे ॥
सदरे टोप्या कोट जाकिटें शीव मला आई ।
मुलगी ह्मणते चोळी फाटली शिऊन तरी देईं ॥
लाव विरडें आई येवढें माझ्या सदऱ्याला ।
तों आठवलें दिलें पतिनीं धोतर शिवण्याला ॥

**चा० ब०**— दुलया मी घालिन आतां ।
गोधड्याहि सर्वा पुरत्या ।
हा परकर यमुने करितां ।

**चा० प०**—

ऐशा एक अनेक परीच्या काढितसे तसदी ।
कांहीं नाहीं तर शिवी शेवटीं जुनी फाटकांदी ॥
करा स्त्रियांनो० ॥१५॥

**अर्थ**– मागल्या कडव्यांत सांगितलेलीं सर्व कामें करून जर वेळ उरला तर मग शिवणकामाची योजना होते. ती येणें प्रमाणें:– मुलींना चोळ्यापरकर वगैरे बेताचे, तों मुलांनीं आईला रिकामीशी पाहिली, कीं घेण्याला पाठीशीं आलींच. कोणी ह्मणतें मला सदरा शीव तर कोण ह्मणें मला कोट कर. तिसरा ह्मणतो, आई जाकीट शिवीसना एक. तों मुलीचें टुमणें आलेंच. आई एवढी चोळी तरी दे शिऊन. एक ह्मणतो, तें सगळें राहूंदे, हें बिरडें तरी लावशी-लका? कसलें काय, इतकी धांदल होते तों आठवलें किं आज सर्व कामें ठेऊन स्वतःचें धोतर आधीं शिऊन दिलें पाहिजे. मग दुलयाहि घालून ठेवतें, ह्मणजे मुलांना बऱ्या हांतरायला उपयोग येतील. कांहीं गोधड्या पण शिवीन. थंडीला एकेकाला एकएक होईल पांघरूण. आतां हा यमुनेचा परकर लवकर शिवला पाहिजे. अशा अनेक प्रकारच्या तसदी, पण त्या सुखानेंच काढते. जर कांहींच शिवण नसलें तर जुनीं फाटकींतुटकीं लुगडीं शिवील, पण संसार कामाशिवाय ईश्वरी स्मरण बोलूंच नका. काय हो

दुर्दैव हें !! ज्ञान असून फुकट. कारण ईश्वरीज्ञान नाहीं, तर मोराअंगीं अनेक डोळे होत, तसेंच ईश्वरा शिवाय केलेला काळक्षेप व्यर्थ होय. स्त्रियांनों, अजून तरी जागृत व्हा.

**कडवें १६ वें.**

अतां करमणुकी आहेत आणखी फार वायकांना ।
संसाराचें काम नकोपरि हा हव्यास मना ॥
पोथी लोकरी रेशीम सूत कशिदा तोरण ताट ।
हें विणुनी दाखविती बुद्धिकौशल्याचा थाट ॥
कवड्या सांगरगोटे सोंगट्या क्याट खेळण्याचा ।
मनिं हव्यास न कधि कंटाळा यापरि वेळाचा ॥
करितातीं व्यय आहे पुढें भय हा आठव नाहीं ।
फार झालें तर मैत्रिणीच्या घरिं वसावया जाई ॥

**चा० व०—** कोणी भांडीं घांसिती चक्क ।
मन पाहुन होईल थक्क ।
परि समजा हें मनिं पक्कं ।

**चा० प०—**

मनरुप भांडें मळकट असतां सूख नसेच कधीं ।
समाधान तें दूर तुह्माला चित्त न गोविंदीं ॥
करा स्त्रियांनो० ॥१६॥

**अर्थ**— असो, पहिलीं कामें जीं वर्णन केलीं तीं कांहीं प्रपंच फायद्याचीं तरी असल्यामुळें तो वेळ स्वार्थाकडे तरी खर्च झाला. पण पुढील कामाच्या व्यवसायांत जो वेळ गेला आहे तो तर अगदींच निरुपयोगी. कारण त्यांत फायदा मुळींच नाहीं. फक्त मी अशी शहाणी, मला अशी बुद्धि आहे, हें दार्शित करण्याकरितां हे श्रम आहेत. ते कोणते तर ते करमणुकेला पूज्य मानले जातात. वाहवा!! याच्या पुढें संसारकृत्येंही आठवत नाहींशीं होतात. काय विचारता आतांच्या काळच्या करमणुकी!! पोतीचें विणकाम, लोकरीचें विणकाम, रेशमी रुमाल, सुताचे रुमाल, चोळ्यांवर वगैरे आवडी प्रमाणें कशीदा, फुक-ण्याचीं तोरणें, पोतीचीं तऱ्हतऱ्हेचीं ताटें, हें झालें. याचा कंटाळा आला तर, पुढें खेळ आहेतच. कवड्या, सोंगट्या, सागरगोटे; पण हें विरळाच. क्याट मात्र खरा खेळ व त्याचाच आतांच्या काळीं फार हव्यास व आवड असते. कंटाळा मुळींच नाहीं. स्वयंपाक करून जरा जेवायला वेळ असला, तर चुलीशींसुद्धां तो खेळ होतो. धन्य स्त्रियांची!! कायहो हा वेळाचा ह्मणजे आयुष्याचा दुरुपयोग तरी!! वाईट वाटतें बरें!!

कांहींतरी ईश्वराला आठवा. पुढें यमाला काय सांगाल याची आठवण नाहीं काय? पण छे, कुठचें सुचा-यला? या सगळ्या कामांचा कंटाळा आला, तर कुठे तरी असल्याच एखाद्या मैत्रिणीकडे बसायला जाईल झालें. पण देवाचीं चरित्रें पोथी वगैरे वाचून तदनुसार वर्तन होईल याचें नांव कशाला? पुण्याई पाहिजेना?

## कडवें १७ वें.

चतुर्दीन त्यामाजी अडचण येई महिन्यानीं ।
प्रपंच ना परमार्थ जातसे वेळ व्यर्थ निघुनी ॥
असतो एखादिला नाद गोष्टीच बोलण्याचा ।
निजती जरासा वेळ मिळाल्या, त्याहुन दुसरीचा-॥
ग्रामगितेमाजीच भर असे, अन्य योषितांना ।
गृहस्थिती अभिमान बोलती त्याविषयीं नाना ॥

**चा० ब०—** एवंच असें निष्पन्न ।
राहीच दुरी भगवान ।
सर्वही गुणी संपन्न ।

**चा० प०—**

असे, परी प्रभुविषयीं भावना नाहीं मनीं अगदीं ।
फार झालें तर स्तुति एकाची दुसऱ्याला निंदी ॥
करा स्त्रियांनो० ॥ १७ ॥

**अर्थ**— पूर्वीच्या कडव्यांत सांगितलेला सर्व वेळ कामांत तरी गेला. पण या कडव्यांत सांगितलेला वेळ तर निरर्थकच होय. प्रपंचाला उपयोग नाहीं, व परमार्थ तर दूरच आहे. कोठचा वेळ तर अशौचपणा किंवा महिनेमाहाची अडचण. एखादे स्त्रीचा फार बोलण्याचा स्वभाव असतो, तिची संगतही धरूं नका. कुणाला जरा फुरसद मिळाली पुरे कीं झोंप. दुपारीं झोंप मुळींच घेऊं नये. कारण तो वेळ आपल्याला संसाराचे कामांतून सुटीचा असतो. त्यांत तरी कांहीं ज्ञानाभ्यास करावा. एखादे स्त्रीस गांवांतील विशेष खबरबात ऐकण्याचा व कुटणक्या करण्याचाच नाद असतो. कुणालातर आपल्या कुळाचा अभिमान, गृहाभिमान, देहाभिमान वगैरेचीच चर्चा करण्याची हौस असते, व आपल्यापुढें दुनयेची खातरच वाटत नाहीं. एक सारखं आपलंच बोलत बसायचं!! दुसऱ्याचं बोलणं जणूं काय ऐकुंच येत नाहीं. अस्तु एवंच काय, तर निष्पन्न हेंच कीं, भगवान् परमेश्वर मात्र दूर राहिला आहे. कारण सर्व गुणसंपन्न असून उपयोग काय? तर ते व्यर्थच होत. कारण प्रभू विषयीं भावनेचा लोप असून एक

सारखें कुणाला निंदायचं तर कुणाला वंदायचं; हें काम तोंडानें चालू व देहानें संसार धंदा सुरू असून मनानेंहि त्याचेंच सर्व चिंतन होत आहे. मग मनुष्य-जन्माचें सार्थक तें काय?

## कडवें १८ वें.

या वांचुनही कामें अधिक तीं लग्न मुंज होतां ।
एकदोन महिने न विसंवतां हात नसेच रिता ॥
पदर बारसें न्हाण सुनेचें गर्भादान आहे ।
पुढें वाढित्यां सठी पांचवी मुलगी गरोदर हे ॥
दिवाळसण घरभराणि वाढलें नेईन शेजारीं ।
ऐशी प्रपंचीं वेळ जावया साधन सामुग्री ॥

**चा० ब०**— केल्याविण गत्यंतर ना
परि नाशीवंत खरें ना? ।
ह्मणुनी ह्या उपाधी नाना ।

**चा० प०**—
होऊनी वासनारहित उपासना घेऊनी, अपराधी ।
ह्मणा, क्षणोक्षणीं होतां तो प्रभु तारिल भवउदधी ॥
करा स्त्रियांनो० ॥ १८ ॥

**अर्थ**— याच्या शिवाय दुसरीं कामें किती सांगूं? पण मी तरी या संसारगाण्याचे अशी पाठीस लागलें आहें, किं यांतलें फारसें काम लिहिल्याशिवाय ठेवी-तच नाहीं. सगळीं कामें बरीं, पण का एखादें कार्य निघालें, मग तर स्त्रियांची उमेद विचारूंच नका!! एकदोन महिने तरी त्या लग्नमुंजिचे सामानांत जातात. हात रिकामा मुळींच व्हायचा नाहीं. त्यांतल्यात्यांत कुणाला पदर घालायचा तर कुणाचें बारसेंच करून मूल पाळण्यांत घालायचें. नाहणाचा सोहळा होत आहे, तों पुढें गर्भादान येतच आहे. वाढित्या करूं तों मुलगी गरभार आहेच, ह्मणून पुढें सठी पांचवी होईलच. दिवाळ सण दिलाच पाहिजे. घरभरणीचा बेतही राहतां कामा नये. शेजारीं न्हाण आलें आहे तिथे वाढलें गेलेंच पाहिजे. आतां यांतील कमी तरी काय होणार? अशा अनेक परीच्या अडचणी वेळ जायला कारणीभूत आहेत. पण तो वेळ सार्थकीं का लागला? मुळींच नाहीं. मग हें केलें पाहिजे कीं नको? असें ह्मणाल, तर सांगणें इतकेंचकीं, केल्यावांचून गत्यंतरच नाहीं. पण नाशिवंत आहे असें समजून

केलेंत ह्मणजे बाधक होणार नाहीं. पण तुमचें तसें नाहीं. एखादा जांवई आला किंवा सून आली, किंवा मुलाची मुंज होऊन तुह्मी वरुमाया झाल्यात किं तुह्माला विहीणपणाचा किंवा वरुमायपणाचा ताठा येतो. पण तो काय उपयोगी? हे उपचार शाश्वत का टिकणारे आहेत? व जगांत तुह्मीच का एक विहीण किंवा वरुमाय होता? असो ऐहिक सूख पलीकडे करून ईश्वराची उपासना घेऊन त्याला क्षणोक्षणीं हात जोडून असें सांगावें कीं, देवा, मी अपराधी आहें, परंतु तूं माझ्यावर कृपा करून माझी ह्या भवसागरांतून सुटका कर. असें ह्मणण्यास हरकत नसून तो दयाळू परमेश्वर इतक्या प्रार्थनेवरून आपणास पुष्कळ साह्य देईल. हें अनुभवजन्य आहे.

## कडवें १९ वें.

नविन कुणाचें लग्न होय तरि संक्रांती करितां ।
परोपरीचा हालवा करण्या महिनाभर पुरता-॥
वेळ पुरेना, ऐशा नाना परिच्या व्यवसायीं ।
काळ जातसे स्वप्निंही नसे देवाचें कांहीं ॥
प्रपंचामधें कष्ट कराया नाहिंच कंटाळा ।
ऐशा अबला धीट पहा किती भीत नसति काळा ॥

चा० ब०—

अंतीं यमपाश चुकाया ।
ही कारण नाहीं माया ।
जरि स्मरतां ईश्वरपायां । .

चा० प०—

तरी चुके यमपाश खास हें विसरुं नका अगदीं ।
स्वजन सोयरीं व्याही जांवई दूर त्यजा गरदी ॥
करा स्त्रियांनो० ॥१९॥

**अर्थ**—मुलीचें नवीन लग्न झालें असेल तर जांवयाला व मुलाचें लग्न नवीन झालें असेल तर सुनेला तिळवण वगैरे करण्यास एक महिनाभर वेळ जातो. पण तो हौशीनेंच करतात. मात्र ईश्वराचें स्मरण नसून प्रपंचांतील एकहि कामाचा कंटाळा कसा नाहीं कोण जाणें!! पण तुह्मीं काळाला कशा भीत नाहीं? आपले यमाचे पाश चुकविण्यास ही माया कारण नसून ईश्वरच कारण आहे, तरी हें मुळींच न विसरतां व्याही जांवई, काका मामे, भाऊबंद वगैरे मनानें दूर करावे व परमेश्वराला ओळखून रहाल तरच या संसारांतून सुटाल. नातलग कांहींएक सोडवणूक करणार नाहींत बरें!!

## कडवें २० वें.

गांव नगर कीं देशस्थिति परि कामें जरि भिन्न ।
असति कुठें कशिं त्या विषयींचें ऐका हें वचन ॥
डोंगरगांवीं असतां वस्ती मुख्य पाणी भरण ।
देशावरतीं गहूं बाजरी भाकरिचें दळण ॥
आगरपट्टिला कामाची कधीं नाहीं पूर्तताच ।
एक संपतां एक उभें पुढें वेळ नसे मुळिंच ॥
च्या० ब०— घटकाभर झाडिन वाडी ।
हीरही भराभर काढी ।
कधिं चिंच आंबेही पाडी ।
च्या० प०—
सुपारि पडखलीं किति पाल्हाळी बोलुं आतां, साधी ।
स्वहित अशी स्त्री सुबुद्धिदायक निर्मिल काय विधी ॥
करा स्त्रियांनो० ॥ २० ॥

**अर्थ**— एका गांवीं एक तर दुसऱ्या देशांत निराळें, असे कामाचे थोडेथोडे फेरफार आहेत. पण एक प्रपंचच प्राधान्य. डोंगर गांवीं आपलें घर असलें तर अतीशय मोठें काम ह्मणजे पाणी भरण्याचें. घाटा-वर दळण, व कोंकण किंवा आगरपट्टीला काम कधीं संपतच नाहीं. कधीं वाडी झाडीन, तर कधीं केर-

सुणीचे हीर काढीन, कधीं नारळ सोलूं, तर आळींवारी करूं व आंबे चिंचाहीं पाडूं. एवंच मनांत ईश्वरीप्रेम नसून संसारप्रेम नखशिखांत भरलेलें आहे. कांहींना कांहीं कामांत वेळ गेला ह्मणजे हित झालें असें वाटतें. पण तें हित नसून पुरतें अनहित आहे हें कोण समजेल?

## कडवें २१ वें.

वर लिहिलेलीं कामें सारखीं नसती सर्वांस ।
अधिकउणे परि याच रीतीचा मानसिं ह्व्यास ॥
असो आतां सुविचारि स्त्रियांनो पायां पडतें मी ।
यांतुनि तरणोपाय करावा मन ठेऊनी रामीं ॥
स्वहित आपणा कोणि न सांगे तरणोपायाचें ।
आपलें आपण साध्य करुनि घ्या सार्थक जन्माचें ॥
चा० घ०— मज नाहीं बोध कराया ।
अधिकार असें मी जाया ।
परि स्वजातिचा मम हृदया ।
चा० प०—
येई कळवळा ह्मणुन बोलतें येऊं नका क्रोधी ।
अनुभवजन्य असे बोलणें त्या मजहि उपाधी ॥
करा स्त्रियांनो० ॥ २१ ॥

**अर्थ**— स्त्रियांहो, वर जितकीं कामें लिहिलीं आहेत अथवा पुढें जीं लिहिण्यांत येतील तीं सर्वांना एक प्रकारचींच असतात असें नाहीं. तर तारतम्यानें असें व्यावयाचें कीं, त्याहून थोड्या जास्त प्रमाणांनीं अधीक किंवा कमी सांगितलेलीं अथवा भिन्नभिन्न अशीं असतात. असो, कांहीं असो, परंतु आतां मात्र सुविचारी स्त्रियांचे मी पायां पडतें. त्यांसीं माझी एवढीच विनंति आहे कीं, यांतून आपला तरणोपाय इशस्वरूप जाणून करावा हें उचित होय. कारण, तरणोपाय करावा व हा संसारसमुद्र उल्लंघन करण्याची शक्ति तुमच्या आंगीं असावी असें कोणीही न चिंतितां तो संसार करण्याविषयींच नाना तऱ्हेचा बोध करीत असतात. ह्मणूनच भागवतांमध्यें ऋषभ देवानें " गुरु न सस्यात् । स्वजनो न सस्यात् । पिता न सस्यात् । जननी न सस्यात् " अशा अर्थाचा श्लोक दिला आहे. हा उलटा पालट लिहिला गेला असेल, पण अर्थ हाच आहे कीं, जीं संसारातून सोडविण्याचें ज्ञान सांगत नाहींत, तीं आपलीं यथानुक्रमें कोणीच नव्हत. मी स्त्रीच आहें इतका

बोध करण्याचा अधिकार मला नाहीं, पण स्वजातीच्या कळवळ्यानें लिहिलें आहे. तरी राग धरूं नये. मी पण त्या उपाधींतच आहें.

## कडवें २२ वें.

लेंकुरवाळ्यांची गत झाली निपुत्रीक असतां ।
घेई दत्तक नांव चालंदे रात्रंदिन चिंता ॥
वांझपणानें चित्त उदासिन कुळ उद्धरण्यास ।
करी सोय परि होय अपायाचि हानि लौकिकास ॥
कलीयुगाचा दोष असा कीं, औरस मुलगाही ।
आपुल्या आज्ञेमाजि न राहतां स्वैरपणें राही ॥

**चा० अ०**— परि मूर्खपणा करितों हा ।
गुंतुनी अतीशय मोहा ।
स्वहितास हरविलें पाहा ।

**चा० प०**—

आला जरि सन्नीध काळ तरि डोळ्यांवर धुंदी ।
काय ह्मणावें मोक्षसुखाची दवडितसों संधी ॥
करा स्त्रियांनो० ॥ २२ ॥

**अर्थ—** कोणी अशी शंका घेईल कीं वर दर्शित केलेलीं संसारांतील कामें हीं लेंकुरवाळ्यांचीं आहेत. पण ज्याला मुलबाळ नसेल त्याला कसलें काम आहे, व तो काळजी तरी कशाची करील! अहो, मुलेंबाळें नसलीं तर दुसरीच मोठी काळजी उपन्न होते. ती हीच कीं, आतां आमचें कुळ कसें नांदेल. वडलांचें नांव कसें चालेल. ह्मणून दत्तक घेणें भाग आहे. पण तो कसा मिळेल!! आमचें संगोपन करील किंवा नाहीं!! बाकी हा संशय खरा आहे. कारण कलियुगांत खरा औरस मुलगा सुद्धां जर माता पित्यांना विचारीत नाहीं तर दत्तकाचें काय विचारतां! असो, अशा चिंतेमध्यें असतांना एक विचार ठरतो, कीं मुलगा दत्तक घ्यावा, ह्मणजे सर्व संसारसुख नजरेस पडेल. अशी सोय करतात, पण तें सर्व व्यर्थ जातें. तरीही आपण मूर्ख किती पहा? या मोहरूप शत्रुच्या ताब्यांत सांपडल्यामुळें आपल्या खऱ्या सुखाला खरोखर हरवीत आहों. ह्मणजे मोक्ष मिळण्याची संधी असून तिला हातांनीं ढकलीत आहों. काय आश्चर्य तरी?

## कडवें २३ वें.

कलीमध्यें संसारिं कुणाला सूख असे सांगा ।
जोतो आपुल्यापरी काळजित चिंता सर्वांगा ॥
घरोघरिं बहुपरी विषयींचे बद्दलची वार्ता ।
बाप लेंक भांडती बंधुचें वैर नये वदतां ॥
आई मुलांचे तंटे रोजचे निवडिल तरि कोण ।
सासु सुनेला गांजि अगोदर घेई पुढें उसण ॥

**चा० ब०**— युगिं कलिच्या एक वरिष्ट ॥
मानव हे बहु गर्विष्ट ।
न कळे त्यां इष्ट अनिष्ट ।

**चा० प०**—

परोपकारा स्वप्निं न करिती मरती परि धुंदी ।
काय ह्मणावें आतां यांस कधिं येईल सद्बुद्धी ॥
करा स्त्रियांनो० ॥ २३ ॥

**अर्थ**— मागील कडव्यांत दत्तक मुलांची हकीकत झाली. पण युगमानाच्या नीतीप्रमाणें कलीमध्यें सुखी असें कोण आहे? कोणी नाहीं!! कारण जो तो मनुष्य कसल्याना कसल्या तरी काळजींतच आहे. घरांतील मनुष्यें पाहावीं तर कोणाचें कोणाशीं पटत

नाहीं. ( स्वगत ) देशाविषयीं एकी होण्याबद्दल सभा भरत आहेत, व न्याय अन्याय चुकीं वगैरे सुधारण्यास लोकही उद्युक्त आहेत. पण घरांतील न्यायास मात्र वकील पुरेसे पडत नाहींत. असो. एवंच औरस मुलगा व बाप असला तरी तंटा. बंधूबंधूंचें तर अप्रेम होण्यास लग्न होण्याची खोटी, कीं बिघडलेंच प्रेम ह्मणून समजावें. असें न होईल तर तोच खरा सुदीन, नाहींतर सर्व दुर्दीनच होत, यांत आश्चर्य तें काय? असो, पहिल्यानें सासू सुनेला छळते, व मग आपण त्याचें उसने घेते. ह्मणजे ह्मातारपणीं सून सासूला गांजते. कारण सासू चांगली असली तरीही तिची चांगली सेवा करणारी सून शेंकड्यांत एखादी. मग जर सासूने तिचे हाल केले असले अथवा दुरुत्तर बोलली असली तर त्याचें उसने सून घेईल यांत काय नवल? असो या युगामध्यें वरीष्ट गुण एक मोठा वाईट आहे तो गर्व होय!! त्या मुळेंच कोणी कोणाला मानीत नसून मरे पर्यंत डोळ्यांवर धुंदी असते. याला काय ह्मणावें!! मला नाहीं वाटत आतां यांना सद्बुद्धि येईलशी!! जर

ईश्वरी कृपाच असेल तर बऱ्या पंथांत ह्मणजे मदरहित लीनपणांत येतील. नाहीं तर फुकट जिणे आहे. कारण ईश्वर पाठमोरा झाल्यावर अवगुणांना काय दुकाळ? ह्मणून अज्ञ असोत, सुज्ञ असोत; अधिकारा प्रमाणें स्त्रियांनीं ईश्वरस्मरणास चुकूं नये.

## कडवें २४ वें.

कुणालागिं छळी पुत्र कुणाला त्रास पिता देई ।
कोणाला वरि माता नसते पुत्र गैर होई ॥
पतीलागिं पत्निची उपाधी पुरुष जरि व्यसनी ।
कांतेलातें बाधक होतें परि दैवच ह्मणुनी–॥
सोशित असतां होतां तो गत जन्म फुकट गेला ।
मग ती स्त्री बहुगुणी परि कुणी बरी ह्मणे न तिला ॥
चा० ब०— संसारीं दुःख कैकांना ।
परि स्त्री वर्गाचीं दैना ।
त्यांतही वैधव्य जयांना ।
चा० प०—
द्रव्याविरहित त्यांशिं मानिती श्वानापरि शब्दीं ।
दोहींकडिल माणसें बोलती स्थिति तेथें स्तब्धी ॥
करा स्त्रियांनो० ॥ २४ ॥

**अर्थ**– मनुष्यांस तीन उपाधी, आधी, व्याधी व काम या होत, कोणाचा पुत्र वाईट तर कोणाचा पिता त्रासदायक, कोणी मातृभक्त तर कोणी विभक्त. पतिपत्नी सुस्वभाव असलीं तर ठीकच. नाहीं तर तीं एकमेकांची परस्परांस उपाधीच !! तथापि पतीचा त्रास पत्नीनें सहन करणें योग्य होय. पण जर तो शाश्वत वृद्धपणावेरीं आपण (व स्त्री टिकलीं तर ठीकच) नाहींपेक्षां गत कांतेचें दुःख अवर्णनियच होय! जगामध्यें सर्व प्राणीमात्र नीवडले व कोण जास्त सुखी व दुःखी असा शोध घेतला तर स्त्रिवर्ग गत-कांतच दुःखी होय ( आतांचे पंथ निराळे ते सोडा ) मात्र जरा द्रव्याचा ओलावा असेल तर कोणीतरीं विचारील. तें नसून सासरचे व माहेरचे माणसांचे हरएक गोष्टींवरून जे वाक्बाण येत असतात, त्यांस प्रतीउत्तर ह्मणजे स्तब्ध स्थिती, या शिवाय दुसरें साधनच नाहीं. अशा प्रसंगामध्येंही स्वधर्म, स्वकर्म, स्वजात, हीं न ओळखणें. व स्वदेशाच्या, स्वात्मसुखाच्या वगैरे प्रयत्नांत नसणें, हें केवढें आश्चर्य आहे !! असो ! स्त्रीयांनो हं हं ह्मणतां वय गेलें बरं. तरीं

द्रव्य असल्यास द्रव्यानें, ज्ञान असल्यास उपदेशाने व दोहोंच्या अभावें देशाचें व स्वतःचे ईश्वरभक्तिद्वारातरीं कल्याण चिंतावें ह्मणजे सर्वत्र जय होईल. हें न विसरणे चांगलें. पाप करून पुण्यफळ देणारा देव वेडा नाहीं.

---

## कडवें २५ वें.

### समाप्तिदर्शक.

चोविस कडवीं चोविस तासांचा व्यय दर्शविला ।
विस्तारास्तव क्षुल्लक कामाचा नच मीं लिहिला—॥
भाग परी थोडा हा संशय कुमारिका जगिंज्या ।
शिक्षकि अथवा श्रीमंतीचि असेल सदैव मजा ॥
या त्रयवर्गांनाहि प्रपंचिक कामांची गरज ।
वदतें तेंही ऐकुनि घ्यावें होईल मग समज ॥
मागें वर्णन केलेल्याचा आठव घ्या स्वमनीं ।
भिन्नभिन्न परि कामावांचुन नाहिं जगीं कोणी ॥

चाल— श्रीमंतां बहु व्यवसाय ।
द्रव्यासिं खर्चितां हाय ॥
बहु देखरेखिची संवय ।

१८३७

पत्करलेल्या कामिं दक्ष शिक्षकीं नर्स अवधी ॥०
यमुजननीसम तन धन ईश्वरीं देईल एखादी ॥
करा स्त्रियांनो० ॥ २५ ॥

**अर्थ**– स्त्रीयांनों, संसारगाणें चोविस कडव्यांत पुरें करून दिवसाच्या व रात्रीच्या मिळून चोविस तासांचा व्यय कसा करतों तें वर्णन व तो कसा करावा हें पुढें दर्शीत केलें आहे. पण अवाकजन्य संशय असेल असा आक्षेप घेऊन हें २५ वें कडवें घालून संसारचित्र तापाचा भाग संपूर्ण करतें. तो संशय ह्मणजे हाच कीं, आपल्या देशांत ( जगांत ) ज्या कुमारिका नर्स, मास्तरणी व श्रीमंती वगैरे वायका त्यांस कोठें दार्शत कामाचा विशेष परीचय आहे, व यामुळें त्यांना वेळ पुष्कळ असून तो त्रयवर्ग सुखरुप असा स्वधर्मांत व ईशभक्तींत असणें सहजच होय. खरें, पण अहो पंचभौतिक देहधारी प्राणी ह्मणून जेवढा तेवढ्यांना कांहीं-नाकांहीं काम असणारच, मात्र भिन्नभिन्न असें असतें. तीं क्षुल्लक कामें किती ह्मणून लिहिण्यांत येणार? तथापि ऐका. शिक्षक मुली, नर्स, डॉक्टरणी, मास्तरीणी व इतरही श्रीमंतिणी, ह्मणून हा वर्ग कामा

शिवाय असून कसें चालेल? वरील वर्ग आपल्या सरकारी कामामध्यें पतकरलेल्या योग्यतेनुसार कामांतच असतो व श्रीमंत वर्ग, कोण नोकर कुठे काय करतो, कोण काम करतो अथवा नाहीं, द्रव्य खर्च किती व मिळकत काय तो हिशोब, आल्यागेल्याचा सन्मान, असे अनंत व्यवसायामुळें त्यांसही हें नातें, मिळून वेळ जावयास साधन आहे. मात्र जिला ह्मणून हीत शोधावयाची इच्छा असेल तिनें एकच लक्षांत ठेवावें, कीं कोणताही काल स्थिती वय प्रसंग पण त्यांतून तन धन मन खर्ची देऊन स्वजात सुधारण्याची खटपट व परलोकीं सुखानें गमन होण्याकरितां ईश्वरस्मरण ठेवावें. ह्मण:

केलें तें सांगितलें । व करीन तें दिसेलच ॥

॥ साकी ॥

संसाराचें चित्र भयंकर वाचुनि मन दिलगीरतें ।
परि पद्यात्मक परमार्थाचें पहा पुढिल विषयातें ॥
(ठे) घेउनि मनिं स्थिरता, अंतरीं अर्थ करावा पुरता ॥
ध्यावि मनी स्थिरता?

आपली नम्र,

पुस्तककर्ती.

## आर्या.

येथवरी संसारिक कामांचे वर्णनाकडे होतें
या उपरी परमार्थिक द्वय मार्गी पद्यविषय दाखवितें १
सगुण लिला निर्गुण पर अर्थाचे भाग ज्यामध्यें सरळ
वाचा न ह्मणा ऐशी करित असे कां उगीच ही बरळ २
त्रिवर्गाचे कल्याणास्तव केला असे मि व्यवसाय
सार न घेतां यांतिल वदणे कैसा पुढेंहि सदुपाय ३
बोधसुधा आणि दुसरें जगतीं अमृत मुकुंद नामाचें
टाकुनि त्याशिं खरोखर खरसम ओझें कशास कामाचें ४
स्वाहितास्तव सावध व्हा नाहिं पुन्हा हा नृदेह भागवतीं
बोले प्रत्यक्ष हरी तो आठवितां उठेच ना कुमती ५
कृष्णार्पित कर्माचा मोड न उगवे शुभाशुभें जरि तीं
करणे प्रपंच परितो या अर्थाचाच योजि मी पुढतीं ६

## संसार फोटो समास.



### येथपासून परमार्थाचें पद्यरूप दिग्दर्शन.

## पद १ लें.

( चाल– धांवा गे धांवा बाई कान्हा मी धरिला चोर )

सांगा हो सांगा कोणी, प्रभुराम देखिला काय ।
श्रीराम देखिला काय, पाहिलेत का कुणि पाय, सां०।धृ.।
सद्विद्या कौसल्या ही, सुनुसाठिं मोकली धाय ॥
ज्या हातिं अयोध्या काय, तो द्विपंचरथि करि हाय ॥
सांगाहो० ॥ १ ॥
चुकवुनी मुनीत्रासातें, विधिजेशीं शापशिवाय–।
करि पुढें नृपागृहिं जाय, धनुभंग जयें केलाय ॥
सांगाहो० ॥ २ ॥
भूमिजेशीं वरि आनंदें, परततांच मार्गीं अपाय ।
आत्मानात्म युद्धाशिवाय, जय तिथे नसे तिळप्राय ॥
सांगाहो० ॥ ३ ॥
दुर्बुद्धि कैकयायोगें, जो राम कंदमुळ खाय ।
हरिदळास घेउनी साह्य, जानकीमिषें रघुराय–॥
सांगाहो० ॥ ४ ॥

तनुजन्य अहंकारातें, रावणास वधुनी जाय—।
निजरुपीं अनुज समुदाय, सहराम मथू गुण गाय ॥
सांगाहो सांगा कोणी, श्रीराम देखिला काय ।
प्रभुराम देखिला काय, पाहिलेत का कुणि पाय ॥ ५ ॥

# पद २ रें.

( चाल— सुंदर रूप तुझें रे मशीं बोल विठ्ठूरे )

एकविंशती स्वर्गावरता, सप्तही पाताळीं जो पाहतां,
विधितृणभुंगीलागीं समता, ज्याचि असे तो अजानुबाहू ॥
राम चला पाहूं, सख्यानों राम चला पाहूं ॥
पाहुनिरूपा हरुं त्रयतापा, ध्याऊं तया पदीं—
तनुमन वाहूं ॥ राम० ॥ १ ॥ धृ० ॥

रजका वचनीं, वनिता त्यजुनी,
नेई वनीं फणी, देई सोडुनी,
शत्रु जया मारीच सुबाहू ॥ राम० ॥ २ ॥

नेत्र सुखावती दर्शनीं ज्याचे, घ्राण सुवासें निर्माल्याचें,
कर्णि कथामृत गुण नामाचें,
मन ध्यानाचे चिंतनिं राहू ॥ राम० ॥ ३ ॥

कारितां भक्ति नवविध साधी, आत्मनिवेदन सहजसमाधी,
शदगोगणा आधीं दाशरथी पदीं–,
अर्पू तरी दश दोषी न होऊं ॥ राम० ॥ ४ ॥
प्रभुभक्तीविण भवि जरीं व्यवसाय,
केला तरी ना तुज प्रत्यवाय,
परि जाऊं नेदी स्मरणाची सोय,
ह्मणे मथु होय सितापति सेऊं ॥
रामचला पाहूं सख्यांनो ॥ ५ ॥

# पद ३ रें.

( चाल– गांजिता मला कां नाथा )

कसें तरूं भवांबुधि जळ हें । नच सुटे प्रपंचिक लाहें ।
गांजिती रिपू वध साहा हे ॥
चाल– ही मोठी, बहु खोटी, असे पोटीं–।
वासना न सोडी अजुनी । किति फिरूं प्रभू तरि योनी ॥
निजहितास विट मानोनी ॥
चाल– बहू आवडे, हृदय ओढे, व्रजिन जोडे,

जेव्हां पडे यमाचा धाक । तेव्हां कुणास मारूं मी हाक ।
त्यागिती सुहृद सकळिक ॥
खचित रामाविणे आह्मा नसे परका ॥
हें येथेंच कळत नसेका ॥ १ ॥
चाल— भव छळितो, ह्मणुनि येतों, शरण नमितों,
तव पदींच जग पालका, आज मला निदानीं राखा ॥
चाल— राघवा, सोडवा, या जिवा
तारिली जशी ती गणिका । तशि मला निदानीं
राखा ॥ धृ० ॥ १ ॥
कशि कळेल नवविध भक्ती । ऊठती अनेक मनीं वृत्ती ॥
कल्पना अनावर होती ॥
चाल— अविचारें, सदां वारें, ऊर्मी न सरे,
एकापरीस एक बळ दावी । कशि सबाह्य वस्तु कळावी ।
त्या प्रबोध शक्ति अभावीं ॥
चाल— नवल मोठें, असें वाटे, हृदय फाटे,
अनुभवास हाचकीं धोका । अभ्यास नको बहुतेकां ॥
भव छळितो, ह्मणुनि येतों० ॥ २ ॥
पहा किती कशी नवलाई । आत्मरूप शाश्वत हृदयीं ।
त्या कडे पाहाताचि नाहीं ॥

चाल– मणी कंठीं, परी तुटी, तया साठीं,
हिंडलों दिशा जरि दाही । मशु गुरूविणे श्रृत नाहीं ।
तत्कृपेंच गोचर होई ॥
चाल– गुरुबोधां–, मृताचि सुधा, विणे अबुधां–,
प्रति कळेल वस्तू जरी कां । तरि कशास श्रृतीच्या हाका ॥
राघवा, सोडवा, याजिवा० ॥ ३ ॥

---

# पद ४ थें.

( चाल– यादि वहिमें )

देहांत असुनि भगवान्, कशाला रान,
सेवितां गिरिकंदरीं, धरुनि अंतरीं–,
आशा अभिमान, देहांत० ॥ धृ० ॥
लागलें रत्न हातास, काय तें अजापाळास,
तैसेंच जाहलें खास ॥
चाल– विसरुनी अयोध्यानाथ, चित्त पापांत–,
घातलें, स्वहित, न केलें आन ॥ देहांत० ॥ १ ॥
मानुनी स्वधर्मा वीट, सज्जना छळाया धीट,
परनिंदा दळीतों पीठ ॥

चाल– परि अशा दुर्गुणी खास,
रवीसुत जाच, होय आपणास।
ह्मणुन करूं प्रेमळ प्रभुगुण गान ॥ देहांत० ॥ २ ॥
नको नास्तिकपणींचे बोल,
परि अर्थ कळेना खोल,
नच मनीं भक्तीचें ओल।
चाल– तें सोंग, पोपटी ढंग, शास्त्रिचें अंग,
कळेना अल्पमतीचें ज्ञान ॥ देहांत० ॥ ३ ॥
श्रीराम पदांघ्रीं भृंग,
तन्नामीं असुनियां दंग,
ईच्छिते सज्जनी संग।
चाल– त्याविणें, मानिलें जिणे,
कृष्णयुवतिनें, शवासम जाण ॥ देहांत० ॥ ४ ॥

---

## पद ५ वें.

( चाल– मी समजूं तरी काय )

तूं करिशी तरी काय प्रभू अजुनि ॥ ध्रु० ॥
काय आतां ते पांडव संकटीं।

अथवा कुब्जा देत असे उटी ।
ह्मणुनि मला या भवसिंधुतटीं ।
ठेवियली हरि त्वां उभि करुनी ॥
तूं करिशी तरी० ॥ १ ॥
गजेंद्रासीं का रक्षितोसि जळीं ।
अथवा असती सुभक्तमेळीं ।
सेकूं न येई तुज ही आरोळी ।
हृत्कमळींच निरंतर असुनी ॥ तूं करिशी तरी० ॥ २ ॥
सांग आतां का वधिशी मातुला ।
नवम बौध्य अवतार मग तुला ।
काम कशाचें हरि, रमा तुला ।
येऊं न देच सुखाश्रय त्यजुनी ॥
तूं करिशी तरी० ॥ ३ ॥
नाना संशय दूर करावे ।
प्रसन्न दीनाप्रति त्वां व्हावें ।
सांग रमावर कितिक शिणावें ।
राधिकेनि ह्या तुज आळवोनी ॥
तूं करिशी तरी० ॥ ४ ॥

श्री.

# आईचा व मुलीचा संवाद.

## ( प्रश्नोत्तररूप )

आई ह्मणते— मुली मुली, जवळ ये.

मुलगी ह्मणते— होय आलें, चरणाप्रत वंदन माये.

आ०-- तुझ्या मानसीं मुख्य असा काय हेवा?

मु०-- होईल तितक्या स्वधर्मानें करावी मातापित्यांची सेवा.

आ०-- मातापिता ह्मणजे कोण, हें कळतें का?

मु०— हो, आहे माहित. ईश्वर व तीं नाहीं दोन, नव्हेका?

आ०— मुली, ईश्वर ह्मणजे कोण बरें!

मु०-- माते, हेंच कळत नाहीं खरें.

आ०— असो, पण कळण्याची इच्छा आहे काय?

मु०— होय आई, ह्याच तर मुख्य अभिप्राय.

आ०— अग, अभिप्राय आहे, पण निश्चय आहे?

मु०— ऐसें काय पुससी माये, निश्चय आहेच आहे.

आ०— बरें, आतां ऐक माझे बोल.

मु०— आई, ह्मणूनच चित्त केलें खोल.

आ०— अग, खोल चित्त कशासाठीं?

मु०— आई, तरीच विचाराची होईल भेटी.

आ०— कायग मुली, विचाराचा काय फायदा?

मु०— आई, त्यानेंच कळेल स्वधर्माचा कायदा.

आ०— बाळे, स्वधर्म करणें किं निमित्त?

मु०— शुद्ध व्हावया बुद्धि चित्त.

आ०— मुली शुद्ध चित्त काय करी?

मु०— कळूं लागते वस्तु खरी.

आ०— अशी खरी वस्तु कायगे मुली?

मु०— स्वानुभवानेंच सांगतें. ब्रम्ह वस्तूच शाश्वत मला समजली.

आ०— मग देशकाळें नसेल का वस्तुछेद?

मु०— वस्तु सदा सर्वकाळ अखंड, हेंच ह्मणतात वेद.

आ०— अग, पण तुला वेद कोण सांगे? ( अधिकार नाहींना )

मु०-- आई, अधिकार नसेना. कळून घेतें शास्त्रअर्थ,
आ०-- बरें, पण वेदशास्त्रीं अर्थ एक?
मु०- होय. संशय नको आई, सत्य दोन्ही लेख.
आ०-- ( स्वागत ) पहा, लहान असून ज्ञानी खरी.
मु०-- आई, मोठी होईनच अशी शाश्वत आहेका आयुष्याची दोरी?
आ०- अग, पण गंभीरपणें आधीं ह्मणालीस कळत नाहीं.
मु०- मग कळण्याचा अभिमान असावा का देहीं?
आ०- मुली, देह अवसानानंतर कायग भोग?
मु०-- पुण्य पापाप्रमाणें ज्याच्या त्याच्या दैवानुसार योग?
आ०- पण बाळ, साधारण तरी काय गती?
मु०-- प्रायशः ( बहुतकरून ) जीवांना यमदूत नेती.
आ०- मग सर्वांसच काय यमाचा जाच?
मु०-- वाहवा माते, जाणत असून विचारता मलाच?
आ०- अग, ही तुझी परीक्षाच मुली.
मु०- असें असेल तर पूर्ण कृपाच झाली.
आ०- मग कोण न सांडे कृतांताला?

मु०- आई, तोच न सांपडे, आत्मा दृश्य ज्याशीं झाला.
आ०- कायग, आत्मज्ञानास वाट कोणती?
मु०- नवविध संत बोलती.
आ०- पण मुली, संत शब्द कोणाशीं शोभे?
मु०- आई, ज्याला बाधा नाहीं विषयलोभें.
आ०- विषयलोभें होईल बाधा?
मु०- होय. शत्रु तोच आत्मबोधा.
आ०- मुली, आत्मबोध केव्हां होईल?
मु०- मुख्य अशी वासनावृत्ति जेव्हां जाईल.
आ०- आधीं वासना गेल्याची काय खुण?
मु०- जेव्हां जातील तीन्ही गुण.
आ०- असे तीन गुण काय अपकारी?
मु०- होय माते, दोन तर अगदींच भिकारी?
आ०- ह्मणजे, सत्वगुण मोठा वाटतें?
मु०- होय तोच. त्यानें स्वर्गसुख तरी मिळतें.
आ०- तरी ह्मणजे, स्वर्गसुखहि नीचच का?
मु०- होय माते, त्याला आहे धोका?
आ०- मग धोका नाहीं तें स्थान कोण?
मु०- जेथें गेलीं कर्में दोन.

आ०- तीं कर्मे कोणतीं ग?
मु०- पुण्य अथवा पापसंसर्ग.
आ०- मुली, पुण्यसुद्धां नकोच का तर?
मु०- असें नाहीं. पण ज्ञानापुढें त्याची काय खातर
आ०- अग, पण पुण्याशिवाय ज्ञान होईल कसें?
मु०- माते, ऐकून घ्या सांगतें तसें.
आ०- समजलें, ज्ञानासाठीं पुण्य हवें असेंचना?
मु०- होय. ज्ञानानंतर गलित होते उपासना.
आ०- अग, पण तुझीं कर्मे गळालीं का?
मु०- होय आई, बोधाग्नीनें पावलीं धोका.
आ०- मुली, आतां तुझी वस्ती कोठें?
मु०- जेथें निजानंदपूर लोटे.
आ०- बरें तुझी कोण जाती?
मु०- माते मी आहें देहापरती.
आ०- मुली, तुझें नांव कायं?
मु०- अनाम आहें मुळचीच माय.
आ०- कुमार, सवाशीण किं विधवा?
मु०- अदेहपणें तिन्ही रुपांचा वानवा.
आ०- काय पोर ज्ञानी पहा!

मु०- माते, हें काय नवल. सर्वतोपरी तुमच्याच कृपेचा प्रभाव हा.

आ०- अग, पण आधी ह्मणालीस कळत नाहीं.

मु०- कळण्याचा अभिमान नसावाना आई?

आ०- बरें, पण आतां ईश्वरस्वरूप कळलेंना?

मु०- होय आई. मी, तुह्मी, किंबहुना हें सर्व जग ईश्वरच अशी माझी भावना.

**[ आईनें ह्मणण्याच्या ओव्या. ]**

मुली तुझें शुद्ध ज्ञान । पाहूनि झालें समाधान ॥
आतां हरलें द्वैतभान । प्रपंचा विषयीं जें ॥ १ ॥

करूनि घेतला विवेक । झालें जन्माचें सार्थक ॥
धन्यधन्य माझी लेक । ऐसें वाटे ॥ २ ॥

माता कन्यकेचें मिष । करूनि बोले कांहीं भाष्य ॥
येथें लक्ष द्यावें विशेष । स्त्रिवर्गांनीं ॥ ३ ॥

अर्थ हेतु समजून घ्यावा । पहावें प्रेमें देवाधिदेवा ।
कृष्णकामिनीचा हेवा । कृष्णपदीं रत व्हावें ॥ ४ ॥

॥ श्री कृष्णार्पणमस्तु ॥

# गाणें १ लें.

## हार.

( चाल–सुंदरमुख तुंदिल तनु )

उपकारा कितिक तुझ्या आठवूं तरी ॥
नाहीं केलीं साधनें अनेक मीपरी ॥
करुनि अविद्येस दूर शांति अंतरीं ॥
**चाल**– दिधली, नुरली, पुढली मज चिंता ॥
तुज ध्यातां, सुखसविता, सहज उगवला ॥
रघुविराशिं स्तवनहार हाच गुंफिला ॥
भक्तिभाव प्रेमासह, भक्तिभाव प्रेमासह ।
चरणिं अर्पिला ॥ रघुविराशिं० ॥ धृ० ॥ १ ॥

नवल काय यांत असे भक्तरक्षणा ॥
अवतरलां निर्गुण परि त्याच कारणा ॥
मारुनियां असुर करिशि प्रथम रक्षणा ॥
**चा०**– माता, कांता, जनिता, नलगे तुज ॥
ब्रह्मगूज, अससि सहज, विदित हें मला ॥
रघुविराशि० ॥ २ ॥

अशिच कृपा करुनि सदोदीत बाळकां ॥
द्यावें विज्ञानसौख्य विश्वव्यापका ॥
अंतरिंचा प्रेरक तूं सौख्यदायका ॥
चा०– नकळे, न चळे, न ढळे, रुप तुमचें,
निश्चळसें, हृदयिं वसे, पाहावें त्याजला ॥
रघुविराशिं० ॥ ३ ॥

अंतरींच वस्ति परी दूर पाहतों ॥
उगिच त्रैगुणी पथांत काय वाहवतों ॥
त्यामुळेंच स्वानुभवालागिं आंचवितों ॥
चा०– रामा, आह्मा, नामा,-मध्यें रंतवीं,
हें विनवी, नको पदवी, कृष्णयुवतिला ॥
रघुविराशि स्तवनहार हाच गुंफिला ॥ ४ ॥

## श्लोक.

( स्ववृत्त )

आदौ रूपमनोल्हासं । इदं हारस्य धारणं ॥
पश्चात् राघवसौंदर्यं । कोवा वर्णयते नरः ॥

# गाणें २ रें.

## माळ.

प्रेमाची गुंफुनि माळा । अर्पितें तुला जगपाळा ॥
राघवा ॥ प्रेमाची० ॥ धृ० ॥
भक्तिचा तंतु बळकट । शब्दांचीं सुमनें सुभट ॥
ओंविलीं आनंदें नीट । काढुनी विकल्प देट ॥
सूटला वास घनदाट । शोभीत हिनें तव कंठ ॥
चा०— हीं पुष्प, होतिना शुष्क,
अर्पितां मोक्ष, त्वत्पदकमला,
अनुमान नसे महिपाळा, हे प्रभो—
प्रेमाची गुंफुनि माळा० ॥ १ ॥
सद्विवेक गुलाब मंजूळ । शांतीस ह्मणावें बकुळ ॥
सोनचांफा फूल हें पिंवळं । तो सद्धर्मचि केवळ ॥
तव प्राप्ति मना तळमळ । हीचकीं तुळशि मंजूळ ॥
चा०— या फुलांस, होईना नास,
जाईना वास, अखंड परिमळा,
अंतची नसे गोपाळा, हे प्रभो-
प्रेमाची गुंफुनि माळा० ॥ २ ॥

मोगरी चमेली जाई । सद्‌बुद्धी नामक जूई ॥
गुलछबू अनंत तव पाई । ध्यास हाच शेषशाई ॥
शेवंति कण्हेरी याही । ओंविते सुवासिक पाहीं ॥

**चाल**—

सुविचार पारिजातक, सद्बोध तगर नामक,
ह्मणुं कमळ भक्तिचा तोख, कर्ण हा पिंवळा,
शोभतो कंठिं नृपवाळा, हे प्रभो-
प्रेमाची गुंफुनि माळा० ॥ ३ ॥

हृत्कमळ अर्पिलें पायीं । नुरलेंसे आतां मज कांहीं ॥
तूं मी हा भेदच नाहीं । आह्मी बालक रघुविर आई ॥
राहिलों उदास तिन्ही देहीं । अवलोकुनि तूर्या माई ॥

**चाल**— तरि आज, खुंटलें काज,
दिसे रघुराज, सदा हृत्कमळा,
मधुरेस भक्तिचा चाळा, हे प्रभो—
प्रेमाची गुंफुनि माळा । अर्पितें तुला जगपाळा ॥
हे प्रभो ॥ ४ ॥

---

# गाणें ३ रें.

( चाल—प्रातःकाळ हा होय सुंदरी )

देहिं देव जरि होय तरी तो, कृपेविण नच सांपडे ॥
कृपेविण नच सांपडे, अनुभवियासिं न सांकडें ॥
देहिं देव जरि० ॥ धृ० ॥

तिळामाजि जरि स्नेह लाभतें, घाण्याविरहित नच मिळतें॥
तेली बैल घाणा ही त्रिपुटी, उपरि प्रयत्नें आंतुडे ॥
देहिं देव जरि० ॥ १ ॥

इक्षुदंडिं शर्करा व्यापकी, परिती नाहीं कृपा ठाऊकी ॥
तरि उपयोगा काय चरकीं, रस निघतां मग गूळ घडे ॥
देहिं देव जरि० ॥ २ ॥

दुधामध्यें घृत व्याप्त जरी कां, मंथन केल्याविण लाभे कां ॥
तैसें आत्मानात्मविवेका, वांचुनि एका सर्व नडे ॥
देहिं देव जरि० ॥ ३ ॥

आत्मा व्हावया दृश्य आपणा, नामरुपाची नकरी भावना॥
शास्त्र सद्‌गुरुवाक्य प्रमाणा, अनुभव मथुच्या येई पुढें ॥
देहिं देव जरि० ॥ ४ ॥

# गाणें ४ थें.

## पंखा.

( चाल–काय रुचे तुजला, पुसती राम जानकीला )

घेऊनि करीं पंखा, आज घालूं या श्रीगुरुला वारा ॥ दूर करूं अविचार द्वैत भवभ्रमरूप उबारा ॥ घेऊनि करीं पंखा आज घालूं या श्रीगुरुला वारा ॥ धृ० ॥

चहूं वाचातित बैसले स्थित चित्ता ठाव नसे, जिथें बघ चित्ता ठाव नसे, बुद्धिचा रंगहि लोपतसे ॥ मन जाई मावळून स्फूर्ति अहं आशि न विलसे, स्फूर्ति०, महत्तत्व तें दूर बैसे ॥ अखंड बोधीं अचल समाधी द्वैता नच थारा, जिथें बघ द्वैता०, त्रिभुवनीं नाहिं कोणीं दुसरा ॥ घेऊनि करीं पंखा० ॥ १ ॥

द्वैतभावना तिळभरि जेथें नाहीं तथा समजे ॥ थंडकीं उष्ण ताप जे जे ॥ मुख्य वस्तुला बाधक नसती परि सुभक्त काजें ॥ सेव्यसेवकता त्या व्याजें ॥ अहं सुखी ना दुःखी ऐशा स्वानुभवाच्या सेजे ॥ सुशोभित मम सद्गुरु राजे ॥ अनन्य भावें त्यांशिं नमावें जे निदानिं आसरा ॥ पंथ ते अखिल दूर सारा ॥ घेऊनि करीं पंखा० ॥ २ ॥

काहीं घडावी सेवा ऐशी मनिं आवडी धरिली, गुरूंना खूण मनीं कळली ॥ देऊनी प्रज्ञा वाक्सुमनांची हारमाळ केली, तथापि हेतुमती उरली ॥ मग आवांका धरूनी पंखा आणुनि आकारा, सखेग आ० ॥ वाहिं कैवल्य निराकारा ॥ घेऊनि करीं० ॥ ३ ॥

निश्चय दांडा वरि पंखा सद्भावाचा केला, प्रेम झालरी शोभे त्याला ॥ शुद्ध भावना सन्मति शांती रंग बहू दिधला । उडविलें व्यर्थ कल्पनेला ॥ अविश्वासाशीं सुरुड घातलीं रत्नहि कोनाला, जडविलीं, रत्न० ॥ भक्तिचीं मोत्यें बहू त्याला ॥ लाऊनी केला सुशोभीत सुंदरसा पाहिं नरा, सुशोभित दिसतो पाहिं जरा ॥ सुखकर धरितां होय करां ॥ घेऊनि० ॥ ४ ॥

देहबुद्धि मुळबाधक त्याचे कातरुनी गोंडे । अवस्थारूप जरी तुकडे ॥ लाऊनि निजनिष्ठेचा दोरा शिंविला चोहिंकडे । विवेकें झालर त्याचपुढें ॥ स्वानुभवाची याविण कैंची शांति मनास घडे । या पंख्याचें ज्ञान वडें ॥ यमुजननीचा भाव निर्गुणीं काय लांभ दुसरा, याहुनी हेतु नसे अपरा ॥ धरीं तूं हाचि सुबोध नरा ॥ घेऊनि करीं० ॥ ५ ॥

# गाणें ५ वें.

( चाल– देहाचा मंचक केला )

दिविज विधि मुनि मिळुनियां । कथिती साद्यंत अशा ह्या । वृत्तांता वंदुनि पायां ॥ **चाल**– व्हावयास खळ निर्दळण । करी अवतरण । श्री राम नाम अघ हरण । वदूं जरि आवरुनी करण । तुटे भव धरण ॥ श्री राम नाम० ॥ धृ० ॥ १ ॥

ऐकुनि विनंती फार । घेतलासि तूं अवतार । परि स्वरुपिं न झाला फेर । चा०– भूमिवरी खळ दारुण । हरिशि तत्प्राण । श्री राम० ॥ २ ॥

भक्तांसि तुझ्याविण त्राता । नच असें कळे रघुनाथा । साधूंस विसावा पुरता ॥ चा०– दुर्बुद्धि होतसे लीन । कृपा तव ह्मणुन । श्री राम० ॥ ३ ॥

मम रीत असे उफराटी । नच उपाय प्रभु तुज साठीं । संसारीं खटपट मोठी ॥ चा०– परि खोटि वस्तु ती जीर्ण । उपजणें मरण ॥ श्री राम० ॥ ४ ॥

त्रिजिनाला अंतक अपरें । तव भक्तिविणें नच मख रे । वदती हें मुनिजन सारे ॥ चा०– यमुजननी तुझ्या पदिं शरण । नदे तिशीं मरण ॥ श्री राम० ॥ ५ ॥

# गाणें ६ वें.

## श्रीकृष्णाचें.

( चाल— वाडिगांवीं पुण्यक्षेत्र )

निर्गुण असुनी गुणाशिं आला भक्तरक्षणा, साधुरक्षणा ॥ घेतसे हरी जन्म युगायुगीं दुष्टशासना ॥ त्याचे स्मरणीं भजनिं पूजनीं रत होतांच मना, रमतां स्तुति ध्याना ॥ इंदुभगिनिच्याहून असूं प्रिय दाखवि तो चरणा ॥ श्रीहरि भक्तकृपाळु अंतरीं व्यापक जगताला, तारक जगताला ॥ श्यामसुंदर रूप मनोहर पाहूंगे चला ॥ भक्तांसाठीं भूवैकुंठीं उभा राहीला, जाऊं भेटीला ॥ श्यामसुंदर रूप मनोहर पाहूंगे चला ॥ धृ० ॥ १ ॥

नखें आरक्तवर्ण दिसती अरुणोदय प्रभा, रवीउदय प्रभा ॥ सरळ पोटऱ्या दिसती जैशा कर्दळिचा गाभा ॥ पिंवळा पीतांबर नेसुनि हर्षें सोडीला झगा, राहीला उभा ॥ परब्रह्म हें समजुनि घेतां व्यापक सर्व नभा ॥ भरजरि शेला भक्तार्पिततो हरिनें पांघुरला, प्रभुनें पांघुरला ॥ श्यामसुंदर रूप० ॥ २ ॥

शंख चक्र पद्म गदा हीं घेतसे हातीं, आयुधें धरी हातीं ॥ कंठीं तुळशीहार भक्त ते येऊनी घालीती ॥ वैजयंती माळ आपाद श्री ह्मणे अगे सवती, बोले निष्ठुरती ॥ काय तुझा हा गूण आह्मांहुन हरिला आवडती ॥ केशरी गंध भाळिं असुन वर मुगुटाची दीप्ती, भानुप्रभा कमती ॥ सदा प्रसन्नदृष्टि करूनी भक्तांकडे पाहती ॥ विधिसुत तुंबरसहित ऋषीगण येति दर्शनाला, प्रभुतें पाहण्याला ॥ श्याम० ॥ ३ ॥

अंतरिं निर्गुण बाह्य सगुण हरिध्यान हरी वृजीना, नाम जरी वदना ॥ भवार्णवातें लंघुन मानव पावति निज सदना ॥ वेदशास्त्रिंचा अर्थ याहुनी काय असे पाहना, समजुन कां घ्याना ॥ परोपरीचे ग्रंथ मानव तरण्याकरितांना । परी ऐकती ऐसे मानव दुर्लभ शोधांना, मिळतिल जरि कोणा ॥ यमुजननीचे संगतिला ते सांगुन कां घ्याना । असो आतां मुनिवचनिं अनुसरूं त्यागुनि अहिकाला, स्मरूं अहीअनुजाला ॥ श्याम सुंदर रूप मनोहर पाहूं गे चला ॥ भक्तांसाठीं भूवैकुंठीं ऊभा राहीला, जाऊं भेटीला । श्यामसुंदर रूप मनोहर पाहूं गे चला० ॥ ४ ॥

# गाणें ७ वें.

## रुक्मिणी पत्रिका

( चाल— धांव धांव धांव अतां शीघ्र० )

भिमक गेहीं द्वीज एक सहज पातला ।
क्षेम त्यासि पुसुनि पुजुनि राव बोलिला ॥
बहुत देश ग्राम नगर पाहुनी आलां ।
त्यांत रूप गुण धनवान् कोण भूधरा ॥
रुक्मिणी श्री हरिसीं पत्र देतसे त्वरा ।
द्विजवरा हें त्वरित देई, द्विजवरा० शामसुंदरा ॥
रुक्मिणी श्री हरिसीं० । धृ० ॥ १ ॥

बहुत हिंडलों मी नृपा पाहिलें किती ।
परि न द्वारकेसमान नगर या क्षिती ॥
जेथें वसूदेव तनय कृष्ण सुरपती ।
देखीला रुपेंगुणीं श्रीसहित न परा ।
रुक्मिणी श्री हरिसीं० ॥ २ ॥

ऐकुनि द्विजवाणि मनीं ध्यान बिंबलें ।
रुक्मिणीच्या, मग तियेनीं हीत योजिलें ॥

वरीन यासिं अन्य बाप बंधु कल्पिले ।
करुनि खूण ब्राह्मणासिं कळवि अंतरा ॥
रुक्मिणी श्री हरिसीं० ॥ ३ ॥

सात श्लोक लिहुनि लेख दीधला कसा ।
नंदकुमर श्री हरीसीं मोहिला असा ॥
भक्तिभाव प्रेम वरी दावि फारसा ।
धांवला ह्मणून प्रभू विलंब न जरा ॥
रुक्मिणी श्री हरिसीं० ॥ ४ ॥

पत्रभाव पाहुनि धांव शेष बंधुजी ।
चैद्य मागधां करीं न दे मला आजी ॥
अमरि भिमककुमरि होईल त्वत्पदांबुजीं ।
काजीं या न येशी तरी ऐक उत्तरा ॥
रुक्मिणी श्री हरिसीं० ॥ ५ ॥

घेऊनि जन्म करुनि नेम वरीन आपणा ।
निश्चय हा जाण हरी होईन अंगना ॥
त्वत्प्राप्तीविण कसें सौख्य मन्मना ।
बघुनी वाणि चक्रपाणी हर्षला जरा ॥
रुक्मिणी श्री हरीसीं० ॥ ६ ॥

प्रेमभरें पाहि वाट भिमककन्यका ।
हरिविण न गोड कांहीं प्रार्थी अंबिका ॥
येतसे दयार्णव त्या पाहि कौतुका ।
दर्शनास येतां वधु धरीतसे करा ॥
रुक्मिणी श्री हरिसीं० ॥ ७ ॥

रथिं घाली लक्षुमीस हेतु पाहुनी ।
इतर भूप खिन्नवदन जाति मोहुनी ।
रूप पाहतांच तिचें चकित ते मनीं ।
पार्णि रमा वर्णि मथू त्या कथांतरा ॥
रुक्मिणी श्री हरिसीं पत्र देतसे त्वरा ॥
द्विजवरा हें त्वरित देई शामसुंदरा० ॥ ८ ॥

# गाणें ८ वें.

## श्रीकृष्णाचें.

( चाल— डोहाळे पुरवींग माझे )

ऐक एश्वदे तुझ्या मुकुंदें धरिलें मज पदरीं ।
किती सोसावें तरी, सखेग श्री कृष्णा आवरी ॥ ध्रु० ॥
नानापरिचे खेळ खेळतो भोंवरे चेंडू ।

हुतुतु हमामा कच्छित कान्हा उडवित विटिदांडू ॥
मज पाहतां ह्मणतो या गडीहो हिजपाशी भांडूं ।
फडूं चीर ह्मणुनि ओढितो निःशंकें नीरी ॥
ऐक एश्वदे० ॥ १ ॥
काढि कंचुकी दावी वदला चेंडू कसा घेशी ।
दे दे ह्मणुनी उगाच पाणी स्पर्शवि गालाशीं ॥
तुझें तुला मुल प्रीय परीतें बाधक दुसऱ्याशीं ।
याचे वर्गीचे गोप ते मज वदति दुराचारी ॥
ऐक एश्वदे० ॥ २ ॥
घेऊं कशाला चेंडू याचा मी जातें मार्गीं ।
बघुन एकटी घालि संकटीं करुं पाहतो गार्गी ॥
कौतुक ऐशापरीचें पाहुन सुर हांसती स्वर्गीं ।
तुज जवळीं सांगतां येतसे क्रोध कसा भारी ॥
ऐक एश्वदे० ॥ ३ ॥
ऐशी गोपी बोले क्रोधें परि मोदें भरली ।
श्रीहरिभजनीं गुणिं नामीं निज देहपणें नुरली ॥
परी बाह्य जननीस वदाया आवड मनिं धरली ।
हरिली हरिविण आस ज्यांस दुर नाहिंच कंसारी ॥
ऐक एश्वदे० ॥ ४ ॥

धन्य गोपी श्री हरिस्वरूपीं झाल्या तल्लीन ।
परमेशाप्रति आठवितां मन गेलें मावळुन ॥
प्राप्त होऊनी ज्ञान तदुपरि पावति निजसदन ।
यमुजननीचें सुपुण्य साचें वर्णिन गूण तरीं ॥
ऐक एश्वदे० ॥ ५ ॥

---

# गाणें ९ वें.

## उद्धव.

( चाल– खरी दृष्ट झालि माझ्या श्री हरिला. )

श्री कृष्णविरहरूप उपवासा पारणें ।
निज तत्व म्हणुनि धाडी मज हरि त्या कारणें ॥
श्री कृष्ण० ॥ धृ० ॥

येथुन श्री कृष्ण गेला कंसाज्ञेच्या मिशें ।
तधिं मार्गें उद्धरीले सद्भक्त त्या इशें ॥
खल वधुनी कंसदासी कारि सरळ कायसें ।
त्यालागीं गूढ याचें अधर्माला वारणें– ॥
श्री कृष्ण० ॥ १ ॥

हें ब्रीद सत्य व्हावें यालागीं अवतरे ।
कंसादी दैत्य मारी श्री कृष्ण नंतरें ॥
जरि कळतें तरि करीतो अध्ययन तिळ नुरे ।
सांदिपनी गुरु करोनी आज्ञेला पाळणें ॥
श्री कृष्ण ॥ २ ॥

मज सांगे गुह्य भावें उद्धवजी प्रियकरा ।
जाऊनियां गोकुळांत मम कार्य हें करा ॥
बोधूनी गोपिकांसीं सत्वर यावें घरा ।
मद्विरह दुःसह त्यां त्या दूर वारणें ॥
श्री कृष्ण० ॥ ३ ॥

अध्यात्म ज्ञान सांगें जा गोपीकांप्रती ।
ती आज्ञा मान्य केली ह्मणुनी हो सन्मती ॥
कथितों हा तन्निरोप तुह्मी धन्य यूवती ।
त्यासी श्री हरिचि बाह्यांतरिं पूर्ण पाहणे ॥
श्री कृष्ण० ॥ ४ ॥

सन्निध मी दूर नाहीं ही प्रचिती अद्वय ।
अनिर्वाच्य रूप माझें निर्द्वंद्व निर्भय ॥
नश्वर या नामरूपा जरि कालांतरिं क्षय ।
मी तुह्मीं दोन नाहीं बहु भक्तीच्या गुणें ॥
श्री कृष्ण० ॥ ५ ॥

सगुणाच्या भक्तिभावें गुण कीर्ती आवडे ।
अध्यात्म ज्ञान तेथें गोपींना नावडे ॥
उद्धव तो येत मागें हरिचरणावर पडे ।
गोकुळिंचे वैभवाचीं करिताती वर्णनें ॥
श्री कृष्ण० ॥ ६ ॥

गोपींच्या प्रेमपाशें हरि कैसा बांधिला ।
राधेनें तोच कृष्ण अपरोक्षें शोधिला ॥
आत्मा जो हृत्स्वरूपीं सद्‌गुरुनें बोधिला ।
गुरु शास्त्र अनुभवानें नको अन्य साधनें ॥
श्री कृष्ण० ॥ ७ ॥

---

# गाणें १० वें.

( चाल— राम राम राम राम जपत जा सदा )

देईं देईं शेषशाई, देईं देईं शेषशाई ।
वसन श्रीधरा रे, वसन श्रीधरा ॥ ध्रु० ॥

वस्त्ररहित एकमेळीं, नग्न गोपी पाहुनि जळीं ।
घेऊनी बसे वृक्षडाहाळीं, अखिल अंबरांहो—॥
सकल अंबरां ॥ देईं देईं० ॥ १ ॥

लज्जित व्रतधारि वधू, ह्मणति हरी काय वदूं ।
नंदतनय कार्यसाधू, पातला खराहो–।
आजि पातला खरा ॥ देई देई० ॥ २ ॥

वहु परीनें माधवासिं, विनवित त्या सहगच्छ्यांसीं ।
शीत वाधतें आह्मासीं, वाटूं दे जरा मनीं ।
पाहिं हें जरा हो ॥ देई० ॥ ३ ॥

ह्मणे हरी तुह्मासिं कसें, शास्त्र अधर्मी हें रुचे ।
व्रत धरितां भगवतिचें, मिळविण्या वरा हो ।
मिळविण्यावरा ॥ देई देई० ॥ ४ ॥

यमभगिनी माजि तरीं, नग्न कशा मूर्ख नारी ।
ह्मणुं तुह्मासिं तरि तमारी, जुळुनि त्या करां हो ।
जोडुनि करां ॥ देई देई० ॥ ५ ॥

मजसिं नसे कांहीं काज, माझी गमे तुह्मांसीं लाज ।
तोच मी हा नंदतनुज, ओळखी धराहो–।
अहो, ओळखी धरा० ॥ देई देई० ॥ ६ ॥

देईनाच वस्त्र हरी, निरुपायास्तव कुमारी ।
वंदितात एक करीं, प्रमथ भास्करा हो–॥
दिविज भास्करा ॥ देई देई० ॥ ७ ॥

एक करा वगळुं नका, लाज आतां सर्व विका ।
मग प्रसन्न कृष्ण सखा, होय मी खराहो ।
होय मी खरा ॥ देई० ॥ ८ ॥

ऐकुन हे बोल अपूर्व, कुमारि गोपी त्यजुनि गर्व ।
दोहीं करीं नमिति सर्व, टाकी झरझरा हो ।
वधू नेसल्या त्वरा हो, देई देई० ॥ ९

वचन देई त्यांसि तदां, पुरवि हेतू रमति पदां ।
यमुजननी त्यजुनि मदा; शरण गिरिधरा, असे ।
नमितसे करां ॥ देई देई० ॥ १० ॥

---

# गाणें ११ वें.

( चाल– धनहीन असा होय सखे )

नवल दिसे पाहून तुझी रीत मानवा ।
आत्मज्ञान स्वरुप सौख्य यासिं वानवा ।
त्यजूनि रवीतेज ह्मणासि श्रेष्ठ काजवा ।
अध्रूवाशीं ध्रूव गणूनि, बुडशिकां झणी,
स्वहित बघ मनीं ॥ १ ॥

आत्मलाभ होईल तरीं चुकेल जाचणीं ।
शुद्ध सत्व धरिं महत्व नाहीं त्रैगुणीं ॥ आत्म० ॥ धृ० ॥
अधिकारासम बोलती वेद त्रिविध ते ।
कर्म भक्ति ज्ञान असें शास्त्र बोलतें ।
त्रिषष्ठ वदती हेंच परी तुजसि कोणतें—॥
मुख्य गमे तेंच धरीं स्वहितकारणीं—।
सुगति कारणीं ॥ आत्मलाभ० ॥ २ ॥
ह्मणशिल तपजपही तसा करिन बहुपरी ।
धूम्रपान पर्णाशन शयन भूवरि ।
मूर्तिपूजा वसन भगविं भस्म तनुवरी—॥
लाऊनी ध्यानस्थ जरीं योगसाधनीं ॥
आत्मलाभ० ॥ ३ ॥
व्रतधर्म नेम दान करूनी मोक्ष ना ।
उपवासहि तीर्थाटण अन्य साधना ॥
परि आत्मानात्मशोध नाणिशी मना ।
काय जना दाऊनि ती देहश्रमवणी ॥
आत्मलाभ० ॥ ४ ॥
या चिन्हें नटशि बाह्य हृदयीं सौख्य का—।
असलें तरि नाशिवंत नको हें साधका ।

त्रैयं कालीं अबाधित जें गुज त्रिंबका ।
मिळविन कां तीच वस्तू कृष्णकामिनी ॥
आत्मलाभ होईल तरीं चुकेल जाचणी ।
शुद्ध सत्व धरिं महत्व नाहीं त्रैगुणीं ॥ ५ ॥

---

# गाणें बारावें

## चोवीस नांवें.

( चाल– चंद्रकांत राजाची )

**केशव** स्मरतां क्लेश नासती केशि दैत्य वधिला
**नारायण** या नामभिषानें अजामेळ तरला १
**माधव** ह्मणजे कमलावर जो ब्रह्मरुपें साक्षी
**गोविंद**चि गो इंद्रिय पाळुनि तनुगोकुळ रक्षी २
**विष्णु** नाम हें वैष्णव गाती मुनिजनासिं आवडे
**मधुसूदन** इंद्रादिक ध्याती मीपण मग मोडे ३
**त्रिविक्रम** तिन्ही मूर्ति हरीहर आपण भिन्न होतो
**वामन** द्विजरुपें बलीपासुनि महि त्रयपद घेतो ४

**श्रीधर** संगें श्रीमुख पाहुनि कुब्जा रत झाली
**हृषीकेश** ऋषींलागिं पाळुनी कंसचमू वधिली ५
**पद्मनाभ** हें रूप कळेना पद्मज विधिलाही
**दामोदर** मातेनें बांधिला भक्तिरून तोही ६
**संकर्षण** षड्रिपू नाशितो स्मरण करूं याचें
**वासुदेव** वसुदेव तनय ह्मणुनियां नांव याचें ७
**प्रद्युम्नाचें** चिंतन करितां अंतक होय अघीं-पातका,
**अनिरुद्ध** मज ज्ञान देऊनी करिल मोक्षभागी ८
**पुरुषोत्तम** सुखधाम देहीं आराम तोची आहे
**अधोक्षजाची** मजा किती पहा रज्यवितो जग हें ९
**नारसिंह** रुप धरी भक्त प्रल्हाद रक्षणाला
**अच्युत** ह्मणजे नाश होईना प्रळयांतिंही याला १०
**जनार्दन** मनीं स्फूर्ति देऊनी आपण दिसेना हो
**उपेंद्राला** शोधितां श्रृतीचें वचन खुंटलें हो ११
हर विष्णू हा भेद नसे परी आवड जयां ज्याची
**कृष्ण**–युवतिला गमे करावी भक्ति उभयतांची १२

# गाणें १३ वें.

( चाल— मुरलीधर कुणीतरि दावा )

संसारसिंधु तरण्यासीं, व्हावया नको संन्यासी ॥ ध्रु० ॥
रिपु दूर करावे साही, वैराग्य प्रखर तें हृदयीं ॥
अनुताप उपरती द्वयहीं, निंदा स्तुति अंतरिं साहीं ॥
बोलणें उणे दुसऱ्यासीं, वर्जावें जिवाहिंसेशीं ॥
संसारसिंधु० ॥ १ ॥

वृत्तीस सारुनी मागें, जरि तुझी समाधी लागे ॥
चैतन्यरूप सर्वांगें, ब्रह्मांडीं पिंडीं जो जागे ॥
विक्षेप तयाच्या ढंगें, रसस्वाद कषाय जरि अंगें ॥
येतांहि धैर्यबळ संगें, अनुभविलें सुख नच भंगे ॥
मग कशास भगव्यावेशीं, नलगे स्थिति आश्रमवासी ॥
संसारसिंधु० ॥ २ ॥

अध्यातम ग्रंथ ऐकावे, अद्वैत स्थितीनें रहावें ॥
भूतमात्रीं ब्रह्म पहावें, खल देति त्रास नच भ्यावें ॥
सद्‌गुरूवचन समजावें, ईश्वराशीं लीन असावें ॥
कां विषाद मथू तुझाशीं, ब्रह्मरूप कळलें ज्याशीं ॥
संसारसिंधु तरण्यासीं, व्हावया० ॥ ३ ॥

# आरती मंगला गौरीची.

( चाल— आरती भुवनसुंदराची )

नव्हती स्थूळ सूक्ष्म सृष्टी । हरिहर अथवा परमेष्टी ॥
भूमी खं अग्नि समीर वृष्टी । जळादिक वेद वदे गोष्टी ॥
स्वरुपीं लाऊनियां दृष्टी । वस्तू निजरुप संतुष्टी ॥

चाल— अहंब्रह्म या स्फूर्तिचा भास जाहला ।
तेंच रूप तव, करणी अभिनव,
पुढें असे भव हरि, पद्मज जननें ।
तुझ्यापासुनीच त्रैगुण्यें ॥
आरती जय श्री अन्नपूर्णे । मंगला गौरी परीपूर्णे ॥ १ ॥

ब्रह्मीं उद्भवली ईच्छा जी । अंबे दोन रुपें तुझी ॥
अविद्या अज्ञानामाजी । विद्या मोक्ष बुद्धी सज्जी ॥
महत्तत्त्वा पासावजीं । चित्त मन बुद्धि अहं सहजीं ॥

चाल— निर्मिलें तूंच पंचभूतां प्राणही पहा,
इंद्रियें दहा, वृत्ति ज्या महां,
तुझें करणें, चारि वेदांनि मौन्य धरणें ॥
आरती जय श्री अन्नपूर्णे ॥ २ ॥

वस्तु अक्रियत्व असतां । करि क्रिया अशी तुझी सत्ता ॥
नावं मा रूप जया पाहातां । जाहला जन्म मरण घेता ।
स्थितीविण सुखदुःखापरता । आत्मारामा गुणरहिता ॥

चाल— लाविला अंबे बहु व्यापार,
सृष्टिजोजार, नाहीं ज्या पार,
होती बेजार, तुझ्या स्मरणें—।
विश्रामती द्वैतमेणें ॥

आरती जय श्री अन्नपूर्णे ॥ ३ ॥

देवदानवांदिकां सुगती । नाहीं तुजवाचुनी पुरती ।
दुर्गादेवी तुला वदती । योगी जन सतरावी ह्मणती ॥
सुभक्तां मुक्ति देशी परि ती । पती आज्ञेंच कार्ये करिती ॥

चाल— शिवाची होऊन अर्धांगी दाविलें जगीं,
सुवर्णनगीं, तशी तूं अवघी व्याप्यपणें ।
अनुभव यमूजननी जाणें ॥

आरती जय श्री अन्नपूर्णे । मंगलागौरी परिपूर्णे ॥ ४ ॥

## दिंडी.

मती कैशी मज कवन करायाशीं ।
परी देवें बुद्धि जी अनायाशीं ॥
दिली तैसे लिहिले मी शद्ब दोन ।
आर्य भगिनीच्या आग्रहावरून ॥ १ ॥

## अभंग.

सद्गुरु प्रसादें कवन जें कांहीं ।
केलें तें सर्वही तयां पाओ ॥ १ ॥
परोपकारार्थ लिहीलें पुस्तक ।
नको कांहीं एक मोठेपणा ॥ २ ॥
केरुं स्वमनानें लिहीलें हस्तानें ।
अर्पीतें प्रेमानें स्त्रीवर्गास ॥ ३ ॥
कृष्णकामीनीस कृष्ण गुरुप्रीय ।
नादानीची सोय पाहाली म्या ॥ ४ ॥

**श्री गुरुपादारविंदस्मार्पितं**

श्री कृष्णार्पणमस्तु.

# शुद्धि पत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १७ | १ | करी | भरी |
| १७ | १८ | करून | भरून |
| ३३ | ८ | पोथी | पोती |
| ३५ | १९ | ऐकाची | एकाची |
| ४१ | १० | आंबेही | आंबेमग |
| ४१ | १२ | पडखली | पडसली |
| ४२ | १३ | साध्य | साद्य |
| ४३ | १४ | गुरुन | गुरुनें |
| ४३ | १५ | सस्यात् | सास्यात् |
| ७१ | १ | कृपेविणे | क्रियेविणें |
| ७१ | ७ | कृपा | क्रिया |
| ७२ | १४ | ऐशा | अशा |
| ८० | ३ | फहूं | फेहूं |
| ८८ | ७ | अर्धी | अर्मी |

ग्रा. क्र. ९८३९

REFBK-0001831

REFBK-0001831